| 7 | प्रिती ज्ञानेश्वर डहाने DGPPDDF8401 | 1888 | LHC | Pusad City | 42300 | S 09 | 43600 | नियमित वेतनवाढ |
| 8 | पवन देवराव बन्सोड DGPPDBM9801 | 1539 | PC | PHQ | 23100 | S 07 | 23800 | नियमित वेतनवाढ |

१ उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांना वेतन अदा करण्यात आले असल्यास तातडीने वसूल करावे.

२ संबंधित पोलीस अंमलदार यांना या आदेशात नमुद केल्याप्रमाणे वेतन देय राहील. त्यांचे देय / अदा झालेल्या वेतनात अनियमितता / तफावत निर्दशनास आल्यास आवश्यक ती वसुली / थकबाकीची कार्यवाही करण्यात यावी.

३ सदर वेतनिश्चीती ही, वेतन पडताळणी पथक यांचेकडून प्रमाणित होण्याच्या अधिन राहुन करण्यात येत आहे. वेतन पडताळणी पथक यांचेकडून आक्षेप नोंदविल्यास, त्याप्रमाणे सुधारणा करण्यात येईल. तसेच अतिप्रदान होत असल्यास वसुली करण्यात येईल.

४ सदर वेतन निश्चिती ही शासन निर्णय, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक : संकीर्ण -२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि. २२/११/२०२१ च्या तरतुदीस अनुसरुन वचनपत्र सादर करणेच्या अटीचे अधीन राहुन करण्यात येत आहे.

(कुमार चिंता) भा. पो. से.,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव : १) प्रमुख लिपीक, लेखा शाखा (वेतन लिपीक - ३ प्रतीत), पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ.

२) प्रभारी अधिकारी पोस्टे दारव्हा-पुसद श.-वाहतुक शाखा/नियंत्रण कक्ष/रापोनि-पोमु,

३) राजपत्र लिपीक/नोंदणी लिपीक.

प्रत माहितीस्तव: जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, यवतमाळ.

# कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड:४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्र. (०७२३२) २५६७०० / फॅक्स क्र (०७२३२) २५६७१० / समाधान क्रमांक ९४०३८६३२८२.


क्र.:पोअय/आस्था./कक्ष-९(४)/पो.अं. १५०१ ते २०००/जुलै - २०२६ वेतनवाढ/२०२६- यवतमाळ, दि.

**कार्यालयीन आदेश.** 8720 27 AUG 2026

संदर्भ :- १) पोलीस अधीक्षक, यवतमाळ कार्यालयाचे आदेश क्र. ४१९०, दि. १८/५/२०२६.
२)आदेश क्र. ६१८३, दि. ८/७/२०२६ (जुलै वार्षिक वेतनवाढ आदेश.)
३) पोलीस अधीक्षक कार्यालय, लोहमार्ग छत्रपती संभाजीनगर यांचेकडील पत्र
जा.क्र.पोअलोछस/आस्था-१/जाधव/सेवापट पुर्तता/२०२६- २७९६, दि. ६/८/२०२६ (प्राप्त दि १४/८/२०२६).

विषयः- जुलै - २०२६ नियमित वेतनवाढबाबत. . .

---ooo---

पोलीस अधीक्षक, यवतमाळ या आस्थापना येथे नेमणूकीस श्री. गणेश लालसिंग जाधव, बक्कल क्रमाक १८८३, नेमणूक पोस्ट दिग्रस हे पोलीस हवालदार पदावर आंतर जिल्हा बदलीने पोलीस अधीक्षक, लोहमार्ग छत्रपती संभाजी नगर येथून यवतमाळ येथे दिनांक २/५/२०२६ रोजी हजर झाले.

पोहवा १८८३ गणेश जाधाव हे संगणक अर्हता एम. एस. - सी. आय. टी. परीक्षा जुलै २००६ (प्रमाणपत्र क्र. Sr. No.: १४१५७२३) मध्ये उत्तीर्ण केलेली आहे. शासन अधिसुचना, सा.प्र.वि, मुंबई दि. २८ मे २०१८ मधील तरतुदीनुसार ते संगणक अर्हता पूर्ण करतात. त्याअनुषंगाने त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) १९८१ च्या नियम ३६ व ३९ मधील तरतुदीनुसार व शासन अधिसुचना वित्त विभाग दि. ३० जाने. २०१९ मधील नियम १० अन्वये अनुज्ञेय असलेल्या वेतनसंरचनेमध्ये **जुलै २०२६ ची वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यांत येत आहे.**

| अ. क्र | पोलीस अंमलदार यांचे नाव | बक्कल क्रमांक | पद नाम | कार्यरत ठिकाण | 1/7/2025 वेतनवाढ | वेतन स्तर | 1/7/2026 वेतनवाढ | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | गणेश लालसिंग जाधव सेवार्थ आय डी. DGPGLJM८७०१ | 1883 | HC | Digras | 35400 | S 09 | 36500 | नियमित वेतनवाढ |

१ संबंधित पोलीस अंमलदार यांना या आदेशात नमुद केल्याप्रमाणे वेतन देय राहील. त्यांचे देय / अदा झालेल्या वेतनात अनियमितता / तफावत निर्देशनास आल्यास आवश्यक ती वसुली / थकबाकीची कार्यवाही करण्यात यावी.

२ सदर वेतनिश्चीती ही, वेतन पडताळणी पथक यांचेकडून प्रमाणित होण्याच्या अधिन राहुन करण्यात येत आहे. वेतन पडताळणी पथक यांनी आक्षेप नोंदविल्यास, त्याप्रमाणे सुधारणा करण्यात येईल. तसेच अतिप्रदान होत असल्यास वसुली करण्यात येईल.

३ सदर वेतन निश्चिती ही शासन निर्णय, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक : संकीर्ण -२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि. २२/११/२०२१ च्या तरतुदीस अनुसरुन वचनपत्र सादर करणेच्या अटीचे अधीन राहुन करण्यात येत आहे.

(कुमार चिंता) भा. पो. से.,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव : १) प्रमुख लिपीक, लेखा शाखा (वेतन लिपीक - ३ प्रतीत), पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ.
२) प्रभारी अधिकारी पोस्टे दिग्रस, ३) राजपत्र लिपीक, ४)नोंदणी लिपीक.

प्रत माहितीस्तव: जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, यवतमाळ.

# कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड:४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

दुरध्वनी क्र. (०७२३२) २५६७०० / फॅक्स क्र (०७२३२) २५६७१० / समाधान क्रमांक ९४०३८६३२८२.


क्र.:पोअय/आस्था./कक्ष-९(४)/पोशि-पोना ते पोहवा पदोन्नती/वेतननिश्चिती/२०२६- 8721 यवतमाळ, दि. 27 AUG 2026

## आदेश (वेतन निश्चित).

संदर्भ :- १) या कार्यालयाचे ई ऑफिस ९८९१७, दि. २५/११/२०२६
२) आदेश क्र. ६१८३/२०२६, दि. ८/७/२०२६ ( जुलै - २०२६ वेतनवाढ आदेश)
३) आदेश क्र. ६४०९/२०२६, दि. १०/०७/२०२६ (पदोन्नती आदेश.)
४) आदेश क्र. ७२७०, दि. ३०/७/२०२६ (वेतन निश्चिती आदेश)

विषय:- सुधारित वेतन निश्चिती.

---ooo---

पोलीस अधीक्षक कार्यालय, यवतमाळ येथिल संदर्भाधीन आदेश क्र ६४०९, दि. १०/७/२०२६ अन्वये खालील नमुद पोलीस अंमलदार यांना (पोलीस शिपाई / पोलीस नाईक) पोलीस हवालदार या पदावर वेतन संरचना २६४०० - ८३६०० (एस - ०९) मध्ये सेवाप्रवेशाच्या मुळ सेवाजेष्ठतेनुसार दि. १०/७/२०२६ पासून पदोन्नती देण्यात आली आहे. त्याअनुषंगाने त्यांची वेतननिश्चिती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे बक्कल क्रमांक व नाव | सद्यःस्थितीचे पदनाम | पदोन्नती पदनाम | नेमणूक |
|---|---|---|---|---|
| १ | १५२० राहुल सुरेश रोकडे,<br>सेवार्थ आय डी : DGPRSRM8501 | पोलीस शिपाई | पोलीस हवालदार | पोस्टे पुसद श. |

| विद्यमान वेतन. | | | सुधारीत वेतन. | | | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| वेतन दिनाक | वेतन स्तर | वेतन | वेतन दिनाक | वेतन स्तर | वेतन | |
| ०१/०७/२०२५ | S-०७ | ३७, २००/- | ०१/०७/२०२५ | S-०७ | ३७, २००/- | प्रत्यक्ष वेतन |
| ०१/०७/२०२६ | S-०७ | ३७, २००/- | ०१/०७/२०२६ | S-०७ | ३८, ३००/- | नियमित वेतनवाढ |
| १०/०७/२०२६ | S-०९ | ३८, ७००/- | १०/०७/२०२६ | S-०७ | ३९, ४००/- | पदोन्नती अनुषंगाने वेतनवाढ. |
| | | | | S-०९ | ३९, ९००/- | पदोन्नती अनुषंगाने वेतननिश्चिती. |
| पुढील देय वेतनवाढ दि ०१/०७/२०२७. | | | | | | |

पोलीस अंमलदार क्र. १५२० राहुल रोकडे यांचे वेतन प्रकरणी संदर्भाधीन आदेश क्र. २ व ४ हे रद्द करण्यात येत आहे.

१ उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार यांना थकबाकी रोखीने देय राहील.

२ संबंधित पोलीस अंमलदार यांना या आदेशात नमुद केल्याप्रमाणे वेतन देय राहील. त्यांचे देय / अदा झालेल्या वेतनात अनियमितता / तफावत निर्दशनास आल्यास आवश्यक ती वसुली / थकबाकीची कार्यवाही करण्यात यावी.

३ सदर वेतननिश्चीती ही, वेतन पडताळणी पथक यांचेकडून प्रमाणित होण्याच्या अधिन राहुन करण्यात येत आहे. वेतन पडताळणी पथक यांचेकडून आक्षेप नोंदविल्यास, त्याप्रमाणे सुधारणा करण्यात येईल. तसेच अतिप्रदान होत असल्यास वसुली करण्यात येईल.

४ सदर वेतन निश्चिती ही शासन निर्णय, वित्त विभाग, परिपत्रक क्रमांक : संकीर्ण -२०२१/प्र.क्र.५२/सेवा-३, दि. २२/११/२०२१ च्या तरतुदीस अनुसरुन वचनपत्र सादर करणेच्या अटीचे अधीन राहुन करण्यात येत आहे.

(कुमार चिंता) भा. पो. से.,
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,

उपरोक्त नमुद पोलीस अंमलदार.

प्रत माहिती व कार्यवाहीस्तव : १) प्रमुख लिपीक, लेखा शाखा (वेतन लि. - २ प्रती), २) प्रभारी अधिकारी, पोस्टे पुसद श./ पुसद ग्रा./ पारवा, ३) राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय. ४) राजपत्र लिपीक/नोंदणी लिपीक.

प्रत माहितीस्तव: जिल्हा कोषागार अधिकारी, जिल्हा कोषागार कार्यालय, यवतमाळ.

9553
क्रमांक:पोअय/कक्ष-११/ वार्षिक वेतनवाढ/जानेवारी/ /२०२६
पोलीस अधिक्षक कार्यालय यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता.व जि.यवतमाळ, पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :-

## कार्यालयीन आदेश

खालील नमुद लिपीक वर्गीय कर्मचारी यांनी नियमित एक वर्षाची अर्हताकारी सेवा पुर्ण केल्याने त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम २०१९ वित्त विभाग अधिसुचना क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क्र/सेवा-९ दिनांक ३०/१/२०१९ व शासन अधिसुचना क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क्र१०/सुधारणा-१/सेवा-९ दिनांक २०/२/२०१९ व वित्त विभाग परिपत्रक क्रमांक वेपुर-२०१९/प्र.क्र.८/सेवा-९ दिनांक २०/२/२०१९ अन्वये सुधारित वेतन संरचनेत त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०१/०१/२०२६ पासुन वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यात येत आहे. खालील नमुद लिपीक हे वैद्यकीय रजा वगळुन ६ महिन्यापेक्षा जास्त कालावधीमध्ये कोणत्याही रजेवर नव्हते.

| अ.क्र. | लिपीकाचे नाव | पदनाम | Level | १/१/२०२५ चे वेतन | वेतनवाढ | १/१/२०२६ रोजी देय वेतन | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | राजेश रामनाथ सनई | व.श्रे.लि. | S-१३ | ३६५००/- | ११००/- | ३७६००/- | - |

वर नमुद वश्रेणी लिपीक यांना सदरचे वेतन आकारण्यात आले असले तर सदरची रक्कम समायोजीत करुन वेतनच्या फरकाची रक्कम रोखीने देय राहील . सदर खर्च २०५५ जिल्हा पोलीस बलवेतन -०१ या लेखाशिर्षखाली मंजुर व उपलब्ध असलेल्या अनुदानातुन भागविण्यात यावा. सदर वेतननिश्चिती वेतन पडताळणी पथकाचे अधिन राहुन करण्यात येत असुन वेतन पडताळणी पथकाने वेतन बाबत आक्षेप घेतल्यास त्यांचे निर्देशाप्रमाणे अतिप्रदान रकमेची वसुली करण्यात येईल.

(कुमार चिंता)
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ.**

प्रति,

वरिष्ट श्रेणी लिपीक राजेश रामनाथ सनई नेमणुक -आस्थापणा शाखा कक्ष -९(३)
कक्ष-१७ (वेतन लि-२)/सलेअ लेखा शाखा/कक्ष-१४ यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रत :- कोषागार अधिकारी, यवतमाळ

पोलीस अधीक्षक, कार्यालय, यवतमाळ.
एल.आय.सी.चौक, ता.व जि. यवतमाळ. पिन कोड-445001
Email - sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र.पोअय/आस्था/कक्ष-९(२)/ वार्षीक वेतनवाढ २०२६ / 8738/२०२६, यवतमाळ दिनांक :- 27 AUG 2026

-कार्यलयीन आदेश -

पोलीस अधिक्षक यवतमाळ यांचे आस्थापनेवरील खलील पोलीस अंमलदार यांना त्याच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरं (वेतन) नियम १९८१ च्या नियम ३६ व ३१ मधील तरतुदी च्या अधिन राहुन महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन) नियम शासन अधिसुचना वित्त विभाग १३१९/पं.क्र./सेवा-९/ दि.३० जानेवारी २०१९ मधील नियम १० अन्वेय ज्या पोलीस अमलदार यांनी एक अर्हतकारी सेवापुर्ण केली आहे. त्याना देय अस खालील वेतन सेरचेने मध्ये वेतनवाढ दि.०१ जुलै २०२५ . पासुन मंजुर करण्यात येत आहे. या कार्यलयाचे आदेश क्र.पोअय/आस्था/कक्ष ९ (२)/ व वेतनवाढ २०२५ /६८९३ /२०२५ दि.०२.०७.२०२५मध्ये अशंत बदल करून सुधारित आदेश निर्गमीत करण्यात येत आहे.

| पदनाम | वेतन सरंचना | लेवल |
|---|---|---|
| सपोउपनि | २९२००-९२३०० | S-१० |
| पोलीस हवालदार | २६४००-८३६०० | S-०९ |
| पोलीस नाईक | २५५००-८११०० | S-०८ |
| पोलीस शिपाई | २१७००-६९१०० | S-०७ |

से.नि सफौ/८७८ अशोक नारायण चौव्हाण नेमणूक पो.स्टे वसंतनगर

| प्रत्यक्ष घेतलेले वेतनआदेश स्तंभ-अ | | सुधारिता आदेश स्तंभ-ब | | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | एकूण वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतन | वेतनवाढ | एकूण वेतन |
| ०१.०७.२०२४ | ५११००/ S-१० | ०१.०७.२०२४ | ५११००/- S-१० | | |
| ०१.०७.२०२५ | ५११००/- | ०१.०७.२०२५<br>दि.०१.१२.२०२० रोजी कालबध्द पदोन्नती सफौ पदाचा तिसरा लाभ देण्यात आल्याने पुन्हा वेतननिश्चीती होणार नाही. | ५२६००/- | १६००/- | ५२६००/- |

1.सदर चे वेतन निश्चितीमुळे अनुज्ञेय असणारे वेतन या कार्यालयाचे आस्थापनेवर हजर झाल्याचे दिनांकापासुन प्रत्याक्षात अदा करण्यात यावे.अतिरीक्त वेतन मिळाले असल्यास अतिप्रधान वेतनाची वसुली करून अतीप्रदान वसुली विवरण पत्र आस्थापना शाखा कक्ष 9(२) यांना सेवापटात लावण्याकरीता पुरविण्यात यावे.

2.सदर वेतन निश्चिती ही वेतन पडताळणी पथक यांचे कडून पडताळणी अधिन राहून करण्यात येत आहे. वेतन पडताळणी पथक यांचकडुन आक्षेप नोंदविल्यास ,त्याप्रमाणे सुधारणा व येईल

3.सदर वेतन निश्चितीही शासन निर्णय ,वित्त विभाग,परिपत्रक क्रमांक : संकीर्ण-2021 /प्र.क्र.52/सेवा-3, दि22/11/2021 तरतुदीस अनुसरून वचनपत्र सादर करणेच्या अटीचे अधी करण्यात येत आहे.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ.

प्रति,

कक्ष-18 (वेतन लिपीक -2) (2 प्रतीत) लेखा शाखा/कक्ष-14 डीपीजी माहिती व उचित कार्यवाहीस्तव .

प्रत:- से.नि सफौ/८७८ अशोक नारायण चौव्हाण नेमणूक पो.स्टे वसंतनगर यांना माहितीस

# भाग - ०४

# बक्षिस / मानधन

निरंक

# भाग - ०५

# शिक्षा / निलंबन / सेवानिवृत्ती

E-office :-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअप/कक्ष -१२(१)/पोहवा ९८७ इंदल आडे/कादानो/०६०९/२०२६ दिनांक - 24 AUG 2026

## कारणे दाखवा नोटीस

**कसुरदाराचे नाव :- पोहवा/९८७ इंदल आडे नेमणूक पोलीस स्टेशन, पुसद शहर**

**थोडक्यात कसुरी :-** उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद हे दि.०८/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन पुसद शहर येथे भेट दिली असता पोहवा/९८७ इंदल आडे तुमचे दप्तर तपासणी दरम्यान तुमच्याकडे गुन्हे प्रलंबित असल्याचे आढळुण आले.

---ooo---

उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांनी दि.०८/०८/२०२६ रोजी पोलीस स्टेशन, पुसद शहर येथे भेट दिली असता त्यावेळी बीट अंमलदार **पोहवा/९८७ इंदल आडे नेमणूक पोलीस स्टेशन, पुसद शहर** तुमच्याकडे असलेल्या प्रलंबित प्रकरणाची दप्तर तपासणी घेतली असता खालीप्रमाणे गुन्हयाची प्रकरणे प्रलंबित असल्याचे आढळुन आले.

१) अपराध क्रमांक - ६१८/२०२६ सदर गुन्हा दि.१७/०७/२०२६ ला दाखल आहे. सदर गुन्हयात आतापावेतो फक्त ०३ केस डायरी लिहीण्यात आली. ती अनुक्रमे दि.१७, १८, २५ या तारखेला आहे. सदर गुन्हयात इतर कोणताही तपास केलेला नाही. गुन्हयात ०१ ॲटोचालक ०४ अनोळखी महिला असून हे सराईत गुन्हेगार असण्याची शक्यता असतांना सुध्दा तुम्ही सदर बाबत काहीही माहिती घेतली नाही. तुम्ही घटनास्थळ पंचनाम्यामध्ये कॉलम नं ०७ मध्ये चोरी गेलेला मुद्देमालाचा उल्लेख केला नाही. तसेच ०३ बयान घेतलेले असून ते तिन्ही बयान कॉपी पेस्ट एकसारखेच असल्याचे दिसून येत आहे. तुम्ही सिसिटीव्ही बाबत काहीच माहिती घेतली नाही. ऑपरेशन शिवनेत्र मध्ये सिसिटिव्ही कॅमेरे लावण्याबाबत वारंवार सुचित करुन सुध्दा सिसिटीव्ही कॅमेरे लावण्यात आलेले नाही. तसेच नवीन बिट परिसरात सिसिटीव्ही कॅमेरा ऑपरेश शिवनेत्र अंतर्गत लावणे बाबत काहीही कार्यवाही करण्यात आलेली नाही.

२) तुम्ही अपराध क्रमांक - ३४/२०२६ कलम ८५ भा.न्या.सं. अन्वये नोंद गुन्हयाचा घटनास्थळ पंचनामा अर्धवट केलेला आहे. तुम्ही पंचाची नावे लिहीलेली नाही. ०२ बयान घेतलेले आहे. ते सुध्दा कॉपी पेस्ट एक सारखेच आहे.

३) ई -समन्स पोर्टल बाबत पाहणी केली असता, तुम्हाला पोर्टल वरुन १३० ई-समन्स प्राप्त असून त्यापैकी फक्त ०२ समन्स (दि.१४/०७/२०२६ व दि. २०/०७/२०२६) असे तामील केल्याचे दिसून आले. सदरचे संपूर्ण समन्स दि.०३/०७/२०२६ पासुन प्रलंबित आहेत. पुढील ०७ दिवसात १२ समन्स आहेत असे दर्शविण्यात येत आहे.

४) वरिल कार्यालयाकडील ०८ अर्ज प्रलंबित आहेत त्यामध्ये तुम्ही कोणतीही कार्यवाही केल्याचे दिसून येत नाही.

पोहवा/९८७ इंदल आडे नेमणूक पोलीस स्टेशन, पुसद शहर तुमचे कर्तव्यातील कसुरी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचे पत्र क्र. १९४९/२०२६, दि. १०/०८/२०२६ अन्वये सादर केला आहे. तुम्ही शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना तुम्ही तुमचे कर्तव्यात अक्षम्य बेशिस्तपणा, बेजबाबदारपणा व गैरवर्तन केले आहे. तुमच्या या प्रवृत्तीचा विपरित परिणाम इतर पोलीस कर्मचा-यावर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही. करीता तुम्हाला खालील प्रमाणे प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे.

कसुरदार **पोहवा/९८७ इंदल आडे नेमणूक पोलीस स्टेशन, पुसद शहर** यांना त्यांचेवरिल नमुद कसुरीबाबत मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले) नियम १९५६ मधील नियम ३ (२) (पाच) मधील तरतुदीनुसार **"पुढील देय वार्षीक वेतनवाढ एक (०१) वर्ष रोखण्याची शिक्षा (अपरिणामकारक) का देण्यात येवु नये?** या प्रस्तावित शिक्षेची कारणे दाखवा नोटीस देण्यात येत आहे.

सदरची कारणे दाखवा नोटीस संदर्भात तुम्ही तुमचे स्पष्टीकरण ही नोटीस तुम्हाला प्राप्त झाल्याचे तारखेपासुन १० दिवसाचे आत योग्य मार्फतीने या कार्यालयास सादर करावे. दिलेल्या मुदतीत तुम्ही उत्तर सादर न केल्यास नमुद कसुरी बददल तुम्हाला काही एक सागांवयाचे नाही व कसुरी मान्य आहे असे गृहीत धरुन एकतर्फी अंतिम आदेश निर्गमीत करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

पोहवा/९८७ इंदल आडे नेमणूक पोलीस स्टेशन, पुसद शहर

मार्फत :- उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद

२/- सदर कारणे दाखवा नोटीसची एक प्रत संबधीतास अदा करुन कारणे दाखवा नोटीसच्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

# कार्यालय पोलीस अधिक्षक,यवतमाळ.

एल.आय.सी.चौक,
जिल्हा - यवतमाळ, पिनकोड: ४४५००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in


जा क्र: पोअ/आस्था.कक्ष ९(१)/)/सिक अहवाल/बिनपगारी रजा/सफौ/३८७राठोड/ 8557 /२०२६- दिनांक 24 AUG 2026

## कार्यालयीन आदेश

----ooo---

सफौ/३८७ गणेश राठोड, नेम-पोस्टे उमरखेड हे दिनांक १९/०२/२०२६ ते ०४/०७/२०२६ पावेतो एकुन- १३६ दिवस वैद्यकिय कारणास्तव कर्तव्यावर अनुपस्थित होते.

सफौ/३८७ गणेश उत्तमराव राठोड, नेमणूक-पोस्टे उमरखेड यांचा दिनांक १९/०२/२०२६ ते ०४/०७/२०२६ पावेतो एकुन १३६ दिवस अनुपस्थित कालावधी हा निश्चित करण्याबाबतचा महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम १९८१ मधिल नियम क्र. (६३) नुसार सिक कालावधी खालील प्रमाणे , मंजुर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार नाव पदनाम व बन | नेमणुक | वैद्यकीय कालावधी | दिवस | मंजुर करण्यात आलेली रजा |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | सफौ/३८७ गणेश उत्तमराव राठोड, | पोस्टे-उमरखेड | दि.१९/०२/२०२६ ते दि.०४/०७/२०२६ | १३६ दिवस | बिनपगारी (LWP) |

(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)

(सजैशकुमार गाठे)
पोलीस उप अधिक्षक,(मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्यालय,यवतमाळ

प्रति,

सफौ/३८७ गणेश उत्तमराव राठोड, नेम- पोस्टे उमरखेड
मार्फत - प्रभारी अधिकारी , पोस्टे उमरखेड
प्रत : वेतन लिपीक कक्ष -१८(१-२-३)/ डिपीजी लिपीक कक्ष १४ योग्य कार्यावाहीस्तव सादर.
२/ सेवापट नोंदणी लिपीक

प्रत कार्यवाहीस्तव: प्रभारी अधिकारी, पोस्टे सायबर(e-HRMS)

E-office :-

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र.पोअय/कक्ष-१२(१)/ विनावेतन आदेश /पोहवा-३०६ गजानन राठोड/8611 /२०२६ दिनांक 24 AUG 2026

## आदेश

संदर्भ :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, दिग्रस यांचे पत्र क्र. २१०२/२०२६ दिनांक ११/०८/२०२६

विषय :- कोणतीही पुर्वसूचना न देता अनधिकृत गैरहजर राहील्याबाबत.
पोहवा/३०६ गजानन राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस.

---ooo---

उपरोक्त संदर्भान्वये पोहवा/३०६ गजानन राठोड, नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस हे कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता हेतुपुरस्सर कर्तव्यावरुन परस्पर अनधिकृतपणे गैरहजर असल्याचे आढळुन आल्याने त्यांचा अनधिकृत गैरहजेरीचा कालावधी हा " NO WORK NO PAY" या तत्वानुसार खालीलप्रमाणे मंजुर करण्यात आला आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांचे नाव पदनाम व ब.नं. | नेमणुक | कालावधी | एकुण दिवस | रजा मंजुर |
|---|---|---|---|---|---|
| १) | पोहवा/३०६ गजानन राठोड | पो.स्टे. दिग्रस | दिनांक १९/०६/२०२६ पासुन ते दिनांक ०८/०७/२०२६ पर्यंत | २० दिवस | विनावेतन (LWP) |

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक,यवतमाळ

प्रति,

पोहवा/३०६ गजानन राठोड,
नेमणुक पोलीस स्टेशन, दिग्रस.

मार्फत :- प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन, दिग्रस. (व्दिप्रतीत)
२/- सदर आदेशाची एक प्रत संबधीतास अदा करुन दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकीत नाावानिशी स्वाक्षरी घेवुन सदरची दुय्यम प्रत त्वरीत या कार्यालयास उलट टपाली सादर करावी.

प्रत :- प्रमुख लिपीक आस्थापना, कक्ष-९(१)/कक्ष-१४/कक्ष १८/नोंदणी लिपीक पो.अ.यवतमाळ/पो.स्टे.प्रभारी अधिकारी, दिग्रस यांना माहिती व योग्य कार्यवाहीस्तव.

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

8639

क्र. पोअप/कक्ष-१२/पोनि-दिनेश झांबरे/अपील आदेश/दुय्यम प्रत/ /२०२६ दिनांक 25 AUG 2026

महत्वाचे

संदर्भ :- पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अपील आदेश क्र. पोमसं/११/२२/६/अपील अर्ज -झांबरे/४२/२०२६, दिनांक ०४/०८/२०२६.

विषय :- अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की पोनि/ दिनेश झांबरे, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर, यांनी विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अंतिम आदेश क्र. अप/कक्ष-५/यवतमाळ/पोनि झांबरे/कसुरी/अं.आ/४१८/२०२६, दिनांक ०४/०३/२०२६ अन्वये दिलेली "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक)" या शिक्षेसंबधाने अपील अर्ज सादर करण्यात आला असता, सदर अपील अर्ज फेटाळण्यात येवुन शिक्षा कायम करण्यात आली आहे.

त्याअन्वये पोनि/ दिनेश झांबरे, नेमणुक पो.स्टे. वसंतनगर, यांना देण्यात आलेली शिक्षा कायम करुन अपील अर्ज फेटाळण्यात आल्याबाबतचे अपील आदेशाची प्रत अदा करुन दुय्यम प्रतीवर (पृष्ठांकन पत्रावर सही न करता) त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन ती प्रत सत्वर या कार्यालयास सादर करावी.

सहपत्रः- अपील आदेश

(कुमार चिंता)
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद.

प्रत :- प्र.लि.आस्था/कक्ष-१०/कक्ष-१७/नोदंणी लिपीक, पो.अ.कार्या. यवतमाळ यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

महाराष्ट्र शासन

पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्रमांक : पोमसं/११/२२/६/अपिल अर्ज-झांबरे /४२/२०२६. दिनांक : ई-स्वाक्षरीत नमूद.

संदर्भ :- १) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे पत्र क्र. विपोमनि /अप/कक्ष-५/पोनि-दिनेश झांबरे/अपील अर्ज/२०२६/१२४७, दि.३०/०६/२०२६.

२) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे अंतिम आदेश क्र. अप/कक्ष-५/पोनि-दिनेश झांबरे/कसुरी/अं.आ./४१८/२०२६, दि.०४/०३/२०२६

३) अपीलार्थी पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांचा दि.१०/०५/२०२६ चा अपील अर्ज.

********

पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे हे पो. स्टे. पांढरकवडा, जि. यवतमाळ येथे कार्यरत असताना त्यांनी खालीलप्रमाणे कर्तव्यात कसुरी केलेली आहे.

कसुरी :-

पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे घटकातील सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांना वेळोवेळी आयोजित मासिक गुन्हे सभा, VC, पो.स्टे. च्या अचानक भेटी दरम्यान यवतमाळ घटकात कोणत्याही ठिकाणी अवैध धंदे चालणार नाही याबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचेकडुन सुचना देण्यात आल्या आहे. तसेच याबाबत ठाणेदार पो.स्टे. पांढरकवडा यांना पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे पत्र क्र. पोअय/वाचक/अवैध धंदे/कारवाई/१९४३/२०२४, दि. २२.०८.२०२४ अन्वये अवैध धंद्यावर प्रभावी कारवाई करुन समुळ उच्चाटन करण्याबाबतचे स्पष्ट सुचना/निर्देशपर ज्ञापन देण्यात आले आहे.

उपरोक्त प्रमाणे पो.स्टे. परिसरात कोठेही अवैध धंदे चालणार नाही. याबाबत स्पष्ट सुचना दिल्या असतांना सुध्दा दि. २६.०१.२०२५ रोजी पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पो.स्टे. पांढरकवडा परिसरातील कोल सिटी सोशल क्लब, पाटणबोरी ता. केळापुर येथे अवैध जुगार संबंधाने छापा कार्यवाही करुन ३५ आरोपीविरुध्द कायदेशिर कार्यवाही केली आहे. सदर छापा कार्यवाहीमध्ये एकुण ४५,२१,५४०/- रु. मुद्देमाल जप्त केला आहे. सदर प्रकरणी पो.स्टे. पांढरकवडा येथे क्र. २३/२०२५ कलम २२३ भान्यासं सह कलम ४,५ महाराष्ट्र जुगार अधिनियम सह क ६५ ई महाराष्ट्र दारुबंदी कायद्याअन्वये गुन्हा नोंद आहे.

पो.स्टे. पांढरकवडा हद्दीत पाटणबोरी हे दुरक्षेत्र असुन, सदर दुरक्षेत्रांची सिमा तेलंगना राज्यास लागुन असुन, सदर सिमा अंतर्गत भागात मोठ्या प्रमाणात अवैध धंदे सुरु असतात. त्यामुळे अशा अवैध धंद्याची माहिती काढून अधिनस्त अधिकारी व अंमलदार यांचेकडून व स्वतः अवैध धंद्यावर कार्यवाही करुन त्यांचे समुळ उच्चाटन करणे हे ठाणेदार पो.स्टे. पांढरकवडा यांचे नैतिक कर्तव्य व जबाबदारी आहे. परंतु वरीलप्रमाणे पो.स्टे. पांढरकवडा हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध जुगार सुरु असुन त्यावर ठाणेदार यांनी कोणतीही कायदेशिर कार्यवाही न केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाव्दारे छापा टाकुन कार्यवाही करण्यात आली आहे. उक्त प्रमाणे केलेल्या कारवाई वरुन ठाणेदार यांचे अवैध धंद्यास अभय असल्याचे स्पष्ट होत असुन वरिष्टांनी दिलेल्या सुचना/आदेश ठाणेदार हे गांभीर्याने न घेता त्याकडे जाणिपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याने पो.नि. दिनेश झांबरे, ठाणेदार पो.स्टे. पांढरकवडा यांना सदर कसुरीबाबत ०३ दिवसांचे आंत खुलासा सादर करणेबाबत पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचे ज्ञापन क्र. पोअय/ वाचक/ ज्ञापन/ ६६३/ २०२५, दि. ०३.०३.२०२५ अन्वये कळविण्यात आले होते.

सदर ज्ञापनाचे अनुषंगाने पो.नि. दिनेश झांबरे ठाणेदार पो.स्टे. पांढरकवडा यांनी त्यांचा खुलासा जवळपास ०५ महिने उशिरा विलंबाने सादर केलेला आहे.

वरीलप्रमाणे नोंद गुन्हयातील नमुद कोलसिटी सोशल क्लब, हा पो.स्टे. पांढरकवडा हद्दीत दुरक्षेत्र पाटणबोरी येथे स्थित असुन ज्ञानेश्वर उध्दव देवगडे, अध्यक्ष कोल सिटी सोशल क्लब, मांजरी ता. भद्रावती जि. चंद्रपुर शाखा पाटणबोरी जिल्हा यवतमाळ यांचा हा सोशल क्लब आहे. सदर सोशल क्लबमध्ये सुरु असलेल्या अवैध धंदयासंबंधाने वेळोवेळी वृत्तपत्रांत वार्ताकन होवुन पोलीसांची प्रतिमा जनमाणसांत मलीन झालेली आहे. तसेच जनतेमध्ये सुध्दा सदर सोशल क्लब व पोलीसांप्रती रोष राहिलेला आहे.

सदर कोलसिटी सोशल क्लबवर अवैध जुगार संबंधाने सन २०१८ मध्ये कार्यवाही करुन पो.स्टे. पांढरकवडा येथे अप क्र. ४६९/२०१८ कलम ४,५ म.जु.का. अन्वये ३८ आरोपीविरुध्द गुन्हा नोंद आहे असे असतांनासुध्दा सदर कोलसिटी सोशल क्लब, पाटणबोरी येथे चालणाऱ्या अवैध धंदयाची माहिती काढुन त्यावर वेळीच कायदेशिर कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु कसुरदार यांनी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केलेले आहे.

एकंदरीत पाटणबोरी परिसरात कोणतीही खाण अथवा मोठा उद्योग, मजुर वर्ग नसतांनासुध्दा सदरचा सोशल क्लब सुरु असुन आतापर्यंतच्या कायदेशिर कार्यवाहयांमध्ये सदर ठिकाणी अवैध जुगार खेळणारे व्यक्ती हे जवळपास सर्व नजिकच्या तेलंगणा राज्यातील आहे. त्यामुळे फक्त मनोरंजनाकरिता सदर ठिकाणी सोशल क्लब उघडण्यात आला हे संयुक्तीक वाटत नाही. पो.स्टे. परिसरात सोशल क्लबच्या नावाखाली उपरोक्त प्रमाणे मोठ्या प्रमाणात अवैध जुगार सुरु असणे व त्याची ठाणेदार पो.स्टे. पांढरकवडा यांना माहिती नसणे ही बाब निश्चितच कसुरदार पो.नि. झांबरे यांचे कर्तव्याप्रती संशय निर्माण करणारी आहे. सदरची बाब ही प्रशासकीय दृष्ट्या अत्यंत अतिशय गंभीर आहे. यावरुन तुम्ही पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे नेमणुक, पो.स्टे. पांढरकवडा जि. यवतमाळ येथे प्रभारी अधिकारी या जबाबदार पदावर कार्यरत असुन कर्तव्यात निष्काळजीपणा, बेजबाबदारपणाचे वर्तन केले असून व वरिष्ठांच्या आदेशाची अवहेलना केलेली आहे. त्यांच्या अशा बेशिस्त गैरवर्तनाचा विपरीत परिणाम इतर पोलीस अधिकारी यांचेवर होवुन पोलीस खात्याच्या शिस्तीस बाधा येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

-: कार्यवाहीचा तपशील :-

उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे दि.१३/१०/२०२५ च्या कारणे दाखवा नोटीसव्दारे "पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्ष (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा का देण्यात येऊ नये ? " ही शिक्षा प्रस्तावित केली होती. त्यास अनुसरुन त्यांनी सादर केलेला खुलासा पुर्णत: समाधानकारक वाटत नसल्याने विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे दि.०४/०३/२०२६ च्या अंतिम आदेशान्वये पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांना प्रस्तावित केलेली "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा दिलेली आहे. सदर शिक्षेविरुध्द पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांनी दि. १०/०५/२०२६ अन्वये या कार्यालयास अपील अर्ज विहित मुदतीत सादर केलेला आहे. अपीलार्थी यांनी त्यांचे अर्जात खालील प्रमाणे मुद्दे मांडलेले आहेत.

-: अपिलार्थीचे विवेचन :-

१. शासन परवाना प्राप्त कोलसिटी सोशल क्लब, पाटणबोरी, ता. केळापूर या क्लबला मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी नियम २०० नुसार लायसंस फॉर गेम्स करीता तसेच नियम क्र. १०२ नुसार प्रीमायसेस लायसंस ज्यात इनडोअर गेम्स (कार्ड रुम/कार्ड क्लब) चा अंतर्भाव आहे. त्यास दि. १०/०१/२०२० रोजी मंजुरी देवून परवाना दिला होता. या क्लबचे परवान्याचे मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आदेशाने वेळोवेळी नुतनीकरणही करण्यात आले. पो.स्टे. पांढरकवडा हद्दीत अवैध धंदयासंबंधाने आम्ही स्वतः जातीने लक्ष घालुन पो. स्टाफ चे मदतीने नेहमीच कार्यवाहया करीत असतो. नमुद परवानाप्राप्त सोशल क्लबमध्ये

अवैधरित्या जुगार खेळला व खेळविल्या जात असल्याबाबत माहीती मिळाल्यावर सदर ठिकाणी आम्ही स्वतः जातीने व स्टाफसह वेळोवेळी शहानिषा केली आहे.

२. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबची तपासणी :- दि. १८/०७/२०२४ रोजी सदर कोलसिटी सोशल क्लब मध्ये त्यांना दिलेल्या नियमांचे उल्लंघन करुन अवैध जुगार चालतो, असे माहिती वरुन सदर क्लबची पाहणी करुन कार्यवाही करण्यासाठी आम्ही तसेच सोबत मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, पांढरकवडा श्री. वैजणे, स्था.गु.शा. यवतमाळचे पोउपनिरी हाके व स्टाफ सह चेक केले. परंतु तेथे कोणीही इसम मिळुन आले नाही. याबाबत निल पंचनामा कार्यवाही करून स्टे.डा. नोंद करण्यात आली होती.

३. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबची पुनःतपासणी करुन प्रथम कसुरी अहवाल मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना रवाना :- तसेच यानंतर दि. २७/०७/२०२४ रोजी गोपनीय बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, सदर क्लबमध्ये सोशल क्लबच्या नावाखाली अवैधरित्या जुगार खेळत आहे. यावरुन सदर क्लबमध्ये वरिष्ठांना माहिती देवून क्लब चेक केला असता कलबमध्ये खेळतांना आढळुन आलेल्या ३८ लोकांपैकी एकुण ३२ लोकांकडे कुठल्याही प्रकारची क्लबची मेंबरशीप नव्हती. तसेच सदर सोशल क्लब सकाळी १०.०० ते रात्री १०.०० वा. पावेतो सुरु ठेवावा अशी नियमावली परवान्यामध्ये दिलेली असतांनाही मा जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिलेल्या नियम व अटींचे उल्लंघन करून रात्री १०.४५ वा. पावेतो सुरुच होता, याबाबत सविस्तर पंचनामा कार्यवाही करण्यात आली. या क्लबने शासनाने दिलेल्या परवान्यातील नियम व अटींचे उल्लंघन केल्याने त्याबाबत कार्यवाही करणेस्तव सविस्तर अहवाल मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना पो.स्टे. पांढरकवडा जा.क्र. २३७९/२०२४ दि. ०२/०८/२०२४ नुसार मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे मार्फत पाठविण्यात आला. परंतु त्यावर जिल्हाधिकारी कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही.

४. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबला १० टेबलवरुन २० टेबल युनीट वाढवुन न देणेबाबत तसेच क्लबचा परवाना रद्द करणेबाबत द्वितीय कसुरी अहवाल रवानाः- यानंतर मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे कडून जिविषा/सोशल क्लब परवानगी/४०४१/२०२४, दि. १२/१२/२०२४ नुसार, यातील कोलसिटी सोशल क्लब , पाटणबोरी, ता. केळापुर, जि. यवतमाळ येथील संस्थेच्या सदस्याचे मनोरंजना करिता असलेल्या परवानगी मध्ये अधीकची एक युनीटची (१० टेबलची) परवानगी वाढवून मिळण्याबाबतचे पत्र दि. १६/०१/२०२५ रोजी पो.स्टे. पांढरकवडा येथे प्राप्त झाले. यावर नमुद कोलसिटी सोशल क्लबला युनीटची परवानगी वाढवुन देणेबाबत आमची सक्त हरकत असून त्याचा परवाना रद्द होणेबाबतचा स्वयंस्पष्ट अहवाल पो.स्टे. पांढरकवडा / सोशल क्लब परवानगी / जा.क्र.२३६/२०२५, दि. २०/०१/२०२५ नुसार मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना पाठविण्यात आला. नमुद अहवालातच यातील सोशल क्लबचे मालक ज्ञानेश्वर उध्दव देवगडे, व्यवस्थापक यादगिरी राजेश कुमार व क्लबचे जागा मालक संजय रामलु शिर्ताबार यांचेवर पो.स्टे. पांढरकवडा व पो.स्टे. पाटण, जि. यवतमाळ येथे जुगाराचे गुन्हे यापुर्वीही दाखल असल्याचे नमुद केलेले आहे.

५. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबचा परवाना रद्द करणेबाबत कसुरी अहवाल पाठवुनही मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडुन परवान्याचे पुनः नुतनीकरण मंजुरी :- सदर कोल सिटी सोशल क्लब बाबत मा. तहसिलदार, केळापुर यांना जा.क्र. २७९/२०२५ दि. २९/०१/२०२५ नुसार पत्र पाठवुन परवाना संबंधाने माहिती मागविली असता सदर सोशल क्लबला सन २०२५ करिता कार्ड क्लब कार्ड रुम परवान्याचे नुतनीकरण करण्याबाबत ना देय प्रमाणपत्र त्यांचे कार्यालया कडुन निर्गमीत केल्याबाबत व तसा अहवाल मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना दि. १२/१२/२०२४ रोजीच पाठविण्यात आल्याबाबत माहिती मिळाली. परंतु सदर नुतनीकरणाकरीता पो.स्टे. पांढरकवडा कडुन नाहरकत अहवाल तहसीलदारांनी न मागविता त्यांचे स्तरावर सदर कोल सिटी सोशल क्लबला ना देय प्रमाणपत्र निर्गमीत केले होते. याबाबत मा. निवासी उपजिल्हाधिकारी, यवतमाळ यांचेकडून माहिती मागविली असता पो.स्टे. आवक क्र. ६६६/२५,

दि. ०६/०२/२०२५ नुसार प्राप्त झाली. त्याचे अवलोकन करता सदर सोशल क्लबचे जागेचे व गेम्सचे परवान्याचे नुतनीकरण दि. ०२/०१/२०२५ रोजी करण्यात आले असुन त्याचा कालावधी दि.३१/१२/२०२५ पावेतो असल्याचे नमुद आहे. यावरुन आम्ही नमुद क्लबने मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दिलेल्या नियम, अटींचे उल्लंघन केल्याबाबत कार्यवाही करण्याकरिता दि. ०२/०८/२०२४ रोजी अहवाल पाठविला, परंतु पाठविलेल्या अहवालावर काहीही कार्यवाही झाली नाही. त्यानंतर पुन्हा सदर क्लबने दोन युनिटची परवानगी वाढवून मिळण्याबाबत केलेल्या अर्जावर आमची सक्त हरकत असल्याबाबत तसेच या क्लबचा परवाना रद्द होणेबाबत स्वयंस्पष्ट शिफारस आम्ही दि २५/०१/२०२५ चे पत्रानुसार मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांना केली होती. परंतु तहसिलदार, पांढरकवडा कडून माहिती घेता सदर सोशल क्लबला सन २०२५ करीता परवान्याचे नुतनीकरण करण्याबाबतचा अहवाल मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना दि.१२/१२/२०२४ रोजी तहसील कार्यालयामार्फत पाठविण्यात आल्याबाबत माहिती मिळाली. त्यानंतर नमुद सोशल क्लबचा परवाना मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आदेशाने दि. ०२/०१/२०२५ रोजी पुन्हा ०१ वर्षाकरिता म्हणजे दि.३१/१२/२०२५ पावेतो नुतनीकरण करण्यात आले.

६. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबचा परवाना रद्दबाबत तृतीय कसुरी अहवाल :- नमूद कोल सिटी सोशल क्लब बाबतचा अहवाल मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी पुनश्च मागीतल्याने पुन्हा पो.स्टे. जा.क्र.१४३२/२०२५, दि. १२/०४/२०२५ नुसार क्लबचा परवाना रद्द होण्याकरीता सविस्तर अहवाल पाठविला.

७. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबचा परवाना रद्दबाबत तृतीय कसुरी अहवाल :- त्यानंतरही नमुद कोल सिटी सोशल क्लबवर आम्ही जातीने लक्ष ठेवून असता दि. ०९/०८/२०२५ रोजी गोपनीय माहिती मिळाली की, सदर क्लबमध्ये सोशल क्लबच्या नावाखाली क्लबचे सदस्य नसलेल्या लोकांना गोळा करुन पैशाची बाजी लावून ताष पत्त्याचा हारजीतचा जुगाराचा खेळ खेळवित आहे. अशा माहितीवरुन वरिष्ठांना माहिती देवून सदर क्लबवर पो.स्टे. पांढरकवडा चे स्टाफचे साहाय्याने रेड कार्यवाही केली असता एकुण ३१ आरोपीकडुन नगदी, मोबाईल हॅडसेट, चारचाकी गाड्या, जुगाराचे साहित्य व इतर असा एकूण रु. ४४,७५,९४०/- चा मुद्देमाल जप्त करुन पो.स्टे. पांढरकवडा येथे अप.क्र. ७१४/२५ क. ४,५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सह क. २२३, ३(५) भा.न्या.स. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

८. शासन परवाना प्राप्त सोशल क्लबचा सरतेशेवटी परवाना कायमस्वरुपी रद्द :- यापूर्वी नमुद कोलसिटी सोशल क्लबचे परवाना रद्द करणेबाबत ०३ अहवाल पाठवूनही कोणतीही कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडून झाली नाही. परंतु उपरोक्त अप.क्र. ७१४/२५ नुसार गुन्हा दाखल झाल्यावर मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी आदेश क्र. म.स/करमणुक शुल्क/कावि/३९९/२०२५, दि. १७/१०/२०२५ चे आदेशान्वये नमुद कोलसिटी सोशल क्लबला कार्ड क्लब कार्ड रुम चा परवाना कायदेशिर नियमांचे व दिलेल्या परवान्यातील अटींचा भंग केल्याने सदर परवाना क्र. ०३/२०२० हे कायमस्वरुपी रद्द करण्यात आल्याबाबत आदेश पारित केला.

९. यापुर्वी मार्च २०२५ मध्ये केलेली जुगार प्रतिबंधक नुसार मोठी कार्यवाही :- तसेच नमुद सोशल क्लब व्यतिरीक्त आम्ही व अधीनस्त पो.स्टे. पांढरकवडाच्या स्टाफचे सहाय्याने पाटणबोरी दुरक्षेत्रांतर्गत येत असलेल्या पिंपळखुटी येथील हॉटेल सम्राट येथे चालत असलेल्या अवैध जुगार अड्ड्याबाबत गोपनीय माहिती काढुन दि. १७/०३/२०२५ रोजी रेड कार्यवाही केली. ज्यात नगदीसहीत एकुण रु. ४४,६०,३५०/- चा मुद्देमाल जप्त केला. एकुण ३० आरोपीतांविरुध्द पो.स्टे. पांढरकवडा येथे अप.क्र. २२९/२०२५ क. ४,५ महाराष्ट्र जुगार अधिनियमाप्रमाणे गुन्हा नोंद केला. यावरुन आम्ही पो.स्टे, पांढरकवडा येथे ठाणेदार पदावर कार्यरत असतांना अवैध धंद्यावर कार्यवाही करुन त्यांचे समुह उच्चाटन करणेची नैतिक कर्तव्य व जबाबदारी योग्यरित्या पार पाडली असून अवैध धंद्यास तसेच अवैध धंदे करणाऱ्यांना आम्ही कोणत्याच प्रकारे अभय देत नाही. तसेच वरिष्ठांनी दिलेल्या सुचना आदेशाचे आम्ही विनाविलंब व गांभीर्याने लक्ष देऊन त्यानुसार वेळोवेळी कार्यवाही करत असतो.

१०. आम्ही संदर्भात नमुद अहवालात यापूर्वीच वरीष्ठांना खालील मुद्यांबाबत माहिती पाठविली होती की, सदर सोशल क्लब हा अशा ठिकाणी आहे की, हा कोणाच्या मनोरंजनाकरीता उपयोगात आला हे समजुन येत नाही. या पाटणबोरी परीसरात कोणतीही खाण अथवा मोठा उद्योग नाही. त्यामुळे परीसरात मजुर वर्ग म्हणावा तसा मोठ्या प्रमाणावर राहत नाही, आतापर्यंतच्या कायदेशीर कार्यवाहयामध्ये सदर ठिकाणी खेळणारे व्यक्ती हे जवळपास सर्व नजीकच्या तेलंगाणा राज्यातील होते. त्यामुळे फक्त मनोरंजनाकरीता सदर ठिकाणी सोशल क्लब उघडण्यात आला, हे संयुक्तीक वाटत नाही.

११. आम्हास मिळालेले ७५ बक्षीसे व ०२ वर्षाचे कार्यकाळात मिळालेली २१ प्रशस्तीपत्रे :-पो.स्टे. पांढरकवडा येथे जवळपास ०२ वर्षाच्या कालावधीत आम्हास मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी एकुण २१ प्रशस्त पत्र दिलेले आहेत. ज्यात गुन्ह्याच्या दोषसिध्दीत वाढ -०१, गुन्हे उघडकीस आणणे -०२ (यात दि. १५/०८/२०२५ रोजी मा. पालकमंत्री, मा. जिल्हाधिकारी तथा मा. पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयात प्रशस्तीपत्र), गुन्हे निर्गती करणे -०२, मुददेमाल निर्गती -०४ (पैकी १०० दिवस कृती आराखडयात ०१), सीसीटीएनएस डाटा फिडींग-०६, हरविलेल्या व्यक्तींची शोध मोहीम -०२, महिला व सुरक्षा सक्षमीकरण -०१, गणपती व ईद-ए-मिलाद धार्मिक सण -०२, विधानसभा २०२४ निवडणुक -०१ अशी प्रशस्तीपत्रे आहेत. आमची पोलीस खात्यात जवळपास २१ वर्ष नोकरी झाली असुन आतापावेतो शिक्षा नसुन, वरीष्ठांनी आम्हास गुन्हे उघडकीस आणणे व तपासात केलेल्या भरीव कामगिरीबाबत ७५ पेक्षा जास्त बक्षीसे दिली आहेत.

१२. संक्षिप्त खुलासा :- यापुर्वी स्थानिक गुन्हे शाखा, यवतमाळ ने मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना नमुद शासन मान्य कोल सिटी सोशल क्लब, पाटणबोरी वर कार्यवाही करणेसाठी लेखी प्राधिकृत पत्र प्राप्त करुन दि. २६/०१/२०२५ रोजी कार्यवाही केली होती. नमुद कोल सिटी सोशल क्लब चा परवाना रद्दबाबत आम्ही ०३ कसुरी स्वयंस्पष्ट अहवाल वरीष्ठांमार्फत मा. जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना पाठविले होते. तसेच यानंतरही आम्ही अधीनस्त स्टाफचे मदतीने नमुद सोशल क्लबवर गोपनीय माहितीवरुन दि. ०९/०८/२०२५ रोजी रेड कार्यवाही केली असता ३१ आरोपीकडून नगदी, मोबाईल हँडसेट, चारचाकी गाड्या, जुगाराचे साहीत्य व इतर असा एकुण रु. ४४,७५,४९०/- या मुद्देमाल जप्त करुन पो.स्टे. पांढरकवडा येथे अप.क्र. ७१४/२५ क. ४,५ महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम सह क २२३, ३(५) भा.न्या.सं. नुसार गुन्हा दाखल केला होता. यापूर्वी नमूद कोल सिटी सोशल क्लबचे परवाना रद्दकरणेबाबत ०३ अहवाल पाठवुनही कोणतीही कार्यवाही जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन झाली नाही. परंतु उपरोक्त अप.क्र. ७१४/२५ नुसार गुन्हा दाखल झाल्यावर मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय, यवतमाळ यांनी आदेश क्र. म.सा. करमणुक शुल्क/कावि/३९९/२०२५, दि. १७/१०/२०२५ चे आदेशान्वये नमुद कोल सिटी सोशल क्लबला कार्ड क्लब/कार्ड रुम चा परवाना कायदेशिर नियमांचे व दिलेल्या परवान्यातील अटींचा भंग केल्याने सदर परवाना क्र. ०३/२०२० हे कायमस्वरुपी रद्द करण्यात आल्याबाबत आदेश पारीत केला. तरी आम्ही कर्तव्यात कोणताही निष्काळजीपणा, बेजबाबदारपणाचे वर्तन केले नसुन वरीष्ठांच्या आदेशाची अवहेलना करण्याचे मनातही येत नाही. वरीष्ठांनी दिलेल्या सुचना/आदेशाचे आम्ही गांभीर्याने पालन करतो. तरी मा. महोदयांना विनंती की, आमची पोलीस दलाप्रती निष्ठा व केलेल्या कामाबावत जाणीवपूर्वक विचार करुन आम्हास पुढील देय वार्षिक वेतनवाढ ०१ वर्षाकरिता (अपरिणामकारक) स्थगितीची शिक्षा देण्यात येवु नये, ही विनंती.

-: निष्कर्ष :-

अपीलार्थी पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांचा अपील अर्ज, कसुरीची कागदपत्रे व त्या पृष्ठ्यर्थ असणारे दस्ताऐवज तसेच, विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांच्या निराकरण टिपणीचे काळजीपूर्वक अवलोकन केले असता असे दिसून येते की, अपीलार्थी यांच्याविरुध्द योग्य ती प्रक्रिया राबवून त्यांना शिक्षा देण्यात आलेली आहे. ज्यात अपीलार्थी यांनी त्यांच्या पोलीस स्टेशनच्या अधिनस्त ठिकाणी अवैध धंद्यावर

वरिष्ठांनी सुचना दिलेल्या असतांनाही कोणतीही कार्यवाही केली नसल्याचे पोलीस अधीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालावरून दिसून येते आहे.

तसेच कसुरीतील नमूद घटनेच्या अनुषंगाने त्यांचा खुलासा मागविला असता, त्यांनी खुलासा विहीत मुदतीत सादर न करता ५ महिने विलंबाने सादर केले असून त्याबाबत अपीलार्थी यांनी अपील अर्जात कोणतेही भाष्य केले नाही. एकंदरीत अपीलार्थी यांनी अपील अर्जात उपस्थित केलेले मुद्दे असमाधानकारक असून अस्विकार्ह आहेत. वास्तव, अपीलार्थी पो.नि. झांबरे यांना शिस्तभंग विषयक प्रधिकारी तथा विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी दिलेली शिक्षा ही कसुरीच्या प्रमाणात योग्य आहे. सबब, मी " अपिलीय प्राधिकारी " म्हणून खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

-: अपिल :-

मी, मधुकर पाण्डेय, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई, याव्दारे अपिलार्थी पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे यांना विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी दि.०४/०३/२०२६ च्या अंतिम आदेशान्वये दिलेली "पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्ष (अपरिणामकारक) रोखणे" ही शिक्षा "कायम" ठेवुन त्यांचा अपील अर्ज फेटाळण्यात येत आहे.

२. सादर शिक्षेने अपीलार्थी व्यथित होत असतील तर, हे आदेश प्राप्त झालेल्या दिनांकापासून ६० दिवसांचे आत या कार्यालयाच्या मार्फतीने महाराष्ट्र शासन, गृह विभाग, यांचेकडे फेर तपासणी अर्ज करु शकतात.

Digitally signed by
Madhukar Pandey
Date: 04-08-2026
18:42:56

( मधुकर पाण्डेय )
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

पोलीस निरीक्षक दिनेश झांबरे, नेमणूक पो.स्टे. वसंतनगर, जि. यवतमाळ
( मार्फत :- पोलीस अधीक्षक, यवतमाळ )

प्रत :-

विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

२/- पोलीस अधीक्षक यांनी सदर डिजीटल स्वाक्षरी केलेल्या आदेशांची प्रत पो.नि. झांबरे यांना त्वरीत अदा करुन, दुय्यम प्रतीच्या प्रत्येक पृष्ठावर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून, ती दिनांकित स्वाक्षरीची दुय्यम प्रत सत्वर या कार्यालयास पाठवावी. तसेच त्यांच्या शिक्षेची नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेऊन केलेल्या कार्यवाहीबाबत या कार्यालयास अवगत करावे.

कार्यासन अधिकारी, का.क्र. २, ३ व ९

पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड : ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र. पोअय/कक्ष-१२/पोना-२३५ रवि चव्हाण/फेर अपील/दुय्यम प्रत/ 8613 /२०२६ दिनांक 2 5 AUG 2026

महत्वाचे

संदर्भ :- पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुबंई यांचे फेर अपील आदेश D-१३/ई-५६२५६३/(पोना/चव्हाण/यवतमाळ)/फेरतपासणी/२०३/२०२६ /२३०३१६, दिनांक ११/०८/२०२६.

विषय :- फेर अपील आदेश दुय्यम प्रत सादर करणेबाबत.

---ooo---

उपरोक्त संदर्भाकीत विषयान्वये कळविण्यात येते की, पोना २३५ रवि मनोहर चव्हाण, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ यांनी या कार्यालयाचे आदेश क्र पोअय/कक्ष-१२/वि.चौ/अं.आ/पोना-२३५ चव्हाण/११२४/२०२५, दिनांक २२/०१/२०२५ चे आदेशान्वये दिलेली "पुढील देय वार्षिक वेतनवाढ तिन (०३) वर्ष (परिणामकारक)" या शिक्षेसंबधाने फेर अपील अर्ज सादर करण्यात आला असता, सदर शिक्षेत बदल करून "पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्ष (परिणामकारक)" हि शिक्षा देण्यात आली आहे.

त्याअन्वये पोना २३५ रवि मनोहर चव्हाण, नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ यांना "पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्ष (परिणामकारक)" ही देण्यात आल्याबाबतचे फेर अपील आदेशाची प्रत अदा करून दुय्यम प्रतीवर (पृष्ठांकन पत्रावर सही न करता) त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवुन ती प्रत सत्वर या कार्यालयाचे सादर करावी.

सहपत्र :- फेर अपील आदेश.

( कुमार चिंता )
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,

राखीव पोलीस निरीक्षक,
पोलीस मुख्यालय यवतमाळ.

प्रत :- प्र.लि.आस्था/कक्ष-९/कक्ष-९-१/कक्ष-१८/नोदंणी लिपीक, पो.अ.कार्या. यवतमाळ यांना माहिती व योग्य त्या कार्यावाही करिता.

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. D-१३/ई-५६२५६३/(सपोना/चव्हाण-यवतमाळ)/फेरतपासणी/२०३/२०२६ मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमूद

संदर्भ:- १) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे क्र.अप/ कक्ष-५/ फेर अपिल/ पोशि-२३५ चव्हाण/२०२६/११४२.दि.१६/०६/२०२६ चे पत्र.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे क्र.पोअय/कक्ष-१२/वि.चौ./अं.आ./पोना-२३५ रवि चव्हाण/ ११२४/२०२५. दि.२२/०१/२०२५ चे अंतीम आदेश

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/ पोना-२३५ चव्हाण/२०२५/१२३२५,दि.१०/१०/२०२५ चे अपिल आदेश

४) पोना/२३५ रवि चव्हाण यांचा दि. २०/१२/२०२५ रोजीचा फेरतपासणी अर्ज

*****

अपिलार्थी पोना/२३५ रवि चव्हाण, यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांनी केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

-:दोषारोप:-

१) तुम्ही कसुरदार नापोशि/२३५ रवि मनोहर चव्हाण, पो.स्टे.उमरखेड, येथे नेमणुकीस आहात. तुम्ही दि.२५/१२/२०२१ रोजी सायंकाळी ८.३०वाजता दरम्यान एम.आय.डी.सी. चे वेअर हाऊस जवळ एक आयशर वाहन क्रमांक एच.आर.७३ ऐ-७८४४ ज्या मध्ये आरोपी हे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा घेवुन जात असतांना त्यांना तुम्ही पकडुन पोलीस स्टेशनला आणले व सदर गुटखा बाबत जप्ती पंचनामा कार्यवाही करुन सदर घटनेबाबत पोलीस स्टेशनला आरोपी विरुध्द फिर्यादी दिली यावरुन गुन्ह्यातील आरोपी १) निशार हारुन मोहल्ला रा. छोथेचा, गाव नखरोला, खंबी ११८, होडल जिल्हा पलवल, राज्य हरीयाणा २) रिजवान ३) अमिर सैय्यद ४) अबरार रा. हिमायत नगर यांचे विरुध्द अप क्र.६६८/२०२१ कलम ३२८,३२७,१८८,३४ भादवि सह कलम ५९.२९.(i) (ii), ३०(२) (३) अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

२) त्यानंतर सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/सुजाता बन्सोड पोलीस स्टेशन उमरखेड यांचेकडे देण्यात आला. दिनांक २८/१२/२०२१ रोजी सपोनि सुजाता बन्सोड यांना त्यांचे लेखनिक पोशि/२६२२ राजेश जाधव यांनी माहिती दिली की, पोलीस स्टेशनला असलेला गुटख्याचा मुद्देमाल परस्पर विकण्याच्या पोलीस स्टेशनला चर्चा चालु आहे. म्हणुन सपोनि बन्सोड यांनी सुरक्षीततेच्या दृष्टीने पोलीस स्टेशनचे टेरेस वर मुद्देमाल ठेवून असलेल्या रुमला तुम्ही लावलेला लॉक वर आणि पोलीस स्टेशन मध्ये खाली बाथरुम मध्ये ठेवलेल्या गुटख्याचा मुद्देमाल येथे सुध्दा तुम्ही लावलेल्या लॉकवर त्यांनी त्यांचे स्वत:चे लॉक लावा.

३) दिनांक २९/१२/२०२१ रोजी सपोनि सुजाता बन्सोड यांना तुम्ही "तुमचा गुन्हयातील मुद्देमाल १०५ पोते एवढा असुन तो वर टेरेसवर ठेवलेला आहे. खाली बाथरुम मध्ये ठेवलेला मुद्देमाल हा उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब उमरखेड यांना माहिती आहे. तो तुमचे गुन्हयांशी संबंधित नाही. त्यामुळे तुम्ही खाली लावलेले लॉक काढून टाका" असे म्हटले म्हणुन सपोनि बन्सोड यांनी बाथरुम ला लावलेले लॉक काढुन टाकले त्यानंतर सपोनि सुजाता बन्सोड यांनी टेरेसवर जावुन जप्त गुटख्याचा मुद्देमाल चेक केला असता त्यांचेकडे तपासावर असलेल्या गुन्हयाचा जप्त मुद्देमाल टेरेसवर जप्ती पंचनाम्याप्रमाणे १०५ पोते बरोबर होता. दिनांक ३१/१२/२०२१ रोजी पोनि उमरखेड व सपोनि श्रीमती सुजाता बन्सोड यांनी स्टॉफसह पोलीस स्टेशनचे टेरेसवर जावून वर ठेवलेला मुद्देमाल चेक केला असता तो पंचनाम्याप्रमाणे बरोबर १०५ पोते होता. तसेच खाली बाथरुम मध्ये असलेला मुद्देमलाची बाथरुमच्या गेट मधुन पाहणी केली असता तो दिसून आला नाही. तसेच बाथरुमच्या लॉकची चाबी मिळून आली नाही.

४) कसुरदार नापोशि/२३५, रवि मनोहर चव्हाण, तुमचे सांगणेवरुन घटने दिवशी काही पोते टेरेसवर टाकले व काही पोते हे पोलीस स्टेशनच्या बाथरुममध्ये टाकल्याबाबत [illegible]

महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. D-१३/ई-५६२५६३/(मपोना/चव्हाण-यवतमाळ)/फेरतपासणी/२०३/२०२६ मुंबई, दिनांक ई-स्वाक्षरीत नमूद

संदर्भः- १) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे क्र.अप/ कक्ष-५/ फेर अपिल/ पोशि-२३५ चव्हाण/२०२६/११४२,दि.१६/०६/२०२६ चे पत्र.

२) पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांचे क्र.पोअय/कक्ष-१२/वि.चौ./अं.आ./पोना-२३५ रवि चव्हाण/ ११२४/२०२५, दि.२२/०१/२०२५ चे अंतीम आदेश

३) विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचे क्र.अप/कक्ष-५/यवतमाळ/अपिल आदेश/ पोना-२३५ चव्हाण/२०२५/१२३२५,दि.१०/१०/२०२५ चे अपिल आदेश

४) पोना/२३५ रवि चव्हाण यांचा दि. २०/१२/२०२५ रोजीचा फेरतपासणी अर्ज

*****

अपिलार्थी पोना/२३५ रवि चव्हाण, यवतमाळ येथे कार्यरत असतांना त्यांनी केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे दोषारोप ठेवण्यात आले आहेत.

-:दोषारोप:-

१) तुम्ही कसुरदार नापोशि/२३५ रवि मनोहर चव्हाण, पो.स्टे.उमरखेड, येथे नेमणुकीस आहात. तुम्ही दि.२५/१२/२०२१ रोजी सायंकाळी ८.३०वाजता दरम्यान एम.आय.डी.सी. चे वेअर हाऊस जवळ एक आयशर वाहन क्रमांक एच.आर.७३ ऐ-७८४४ ज्या मध्ये आरोपी हे शासनाने प्रतिबंधित केलेला गुटखा घेवुन जात असतांना त्यांना तुम्ही पकडुन पोलीस स्टेशनला आणले व सदर गुटखा बाबत जप्ती पंचनामा कार्यवाही करुन सदर घटनेबाबत पोलीस स्टेशनला आरोपी विरुध्द फिर्यादी दिली यावरुन गुन्ह्यातील आरोपी १) निशार हारुन मोहल्ला रा. छोथेचा, गाव नखरोला, खंबी ११८, होडल जिल्हा पलवल, राज्य हरीयाणा २) रिजवान ३) अमिर सैय्यद ४) अबरार रा. हिमायत नगर यांचे विरुध्द अप क्र.६६८/२०२१ कलम ३२८,३२७,१८८,३४ भादवि सह कलम ५९.२९.(i) (ii), ३०(२) (३) अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

२) त्यानंतर सदर गुन्ह्याचा पुढील तपास सपोनि/सुजाता बन्सोड पोलीस स्टेशन उमरखेड यांचेकडे देण्यात आला. दिनांक २८/१२/२०२१ रोजी सपोनि सुजाता बन्सोड यांना त्यांचे लेखनिक पोशि/२६२९ राजेश जाधव यांनी माहिती दिली की, पोलीस स्टेशनला असलेला गुटख्याचा मुद्देमाल परस्पर विकण्याच्या पोलीस स्टेशनला चर्चा चालु आहे. म्हणुन सपोनि बन्सोड यांनी सुरक्षीततेच्या दृष्टीने पोलीस स्टेशनचे टेरेस वर मुद्देमाल ठेवून असलेल्या रुमला तुम्ही लावलेला लॉक वर आणि पोलीस स्टेशन मध्ये खाली बाथरुम मध्ये ठेवलेल्या गुटख्याचा मुद्देमाल येथे सुध्दा तुम्ही लावलेल्या लॉकवर त्यांनी त्यांचे स्वतःचे लॉक लावा.

३) दिनांक २९/१२/२०२१ रोजी सपोनि सुजाता बन्सोड यांना तुम्ही "तुमचा गुन्ह्यातील मुद्देमाल १०५ पोते एवढा असुन तो वर टेरेसवर ठेवलेला आहे. खाली बाथरुम मध्ये ठेवलेला मुद्देमाल हा उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब उमरखेड यांना माहिती आहे. तो तुमचे गुन्हयांशी संबंधित नाही. त्यामुळे तुम्ही खाली लावलेले लॉक काढून टाका" असे म्हटले म्हणुन सपोनि बन्सोड यांनी बाथरुम ला लावलेले लॉक काढून टाकले त्यानंतर सपोनि सुजाता बन्सोड यांनी टेरेसवर जावुन जप्त गुटख्याचा मुद्देमाल चेक केला असता त्यांचेकडे तपासावर असलेल्या गुन्हयाचा जप्त मुद्येमाल टेरेसवर जप्ती पंचनाम्याप्रमाणे १०५ पोते बरोबर होता. दिनांक ३१/१२/२०२१ रोजी पोनि उमरखेड व सपोनि श्रीमती सुजाता बन्सोड यांनी स्टॉफसह पोलीस स्टेशनचे टेरेसवर जावून वर ठेवलेला मुद्देमाल चेक केला असता तो पंचनाम्याप्रमाणे बरोबर १०५ पोते होता. तसेच खाली बाथरुम मध्ये असलेला मुद्येमलाची बाथरुमच्या गेट मधुन पाहणी केली असता तो दिसून आला नाही. तसेच बाथरुमच्या लॉकची चाबी मिळून आली नाही.

४) कसुरदार नापोशि/२३५, रवि मनोहर चव्हाण, तुमचे सांगणेवरुन घटने दिवशी काही पोते टेरेसवर टाकले व काही पोते हे पोलीस स्टेशनच्या बाथरुममध्ये टाकल्याबाबत [illegible]

आहे. तसेच दिनांक ३१/१२/२०२१ रोजी टेरेसवर वरील मुद्येमाल ठाणेदार पोलीस स्टेशन उमरखेड व इतर स्टाफनी चेक केल्यावर खाली संडास बाथरुम चे मुख्य गेटला कुलुप असल्याने त्यानी संडास बाथरुमचे गेट मधुन पाहणी केल्यावर त्यांना कोणताही मुद्येमाल दिसुन आला नाही तसेच कुलुपाची चावी मिळुन आली नाही. यावरुन तुम्ही बाथरुममध्ये जप्त मुद्देमाल व्यतिरीक्त काही गुटख्याचे पोते पोलीस स्टेशन अभिलेखावर रेकॉर्डवर नसलेला मुद्येमाल ठेवला होता व तो मुद्देमाल तुम्ही उमरखेड पोलीस स्टेशन परिसरातुन परस्पर गायब केला ही गंभीर स्वरुपाची बाब आहे.

५) कसुरदार नापोशि/२३५ रवि मनोहर चव्हाण, तुम्ही घटनेवेळी पूर्ण मुद्देमालाचा पंचनामा कारवाई करणे अपेक्षित असतांना तुम्ही वरीष्ठांची दिशाभुल करुन पुर्ण मुद्देमालाची पंचनामा कारवाई न करता जप्त मुद्देमाल व्यतिरीक्त काही गुटख्याचे पोते पोलीस स्टेशन अभिलेखावर रिकॉर्डवर नसलेला मुद्देमाल पोलीस स्टेशन मधील खाली बाथरुम मध्ये ठेवून सदर मुद्देमालाची परस्पर विल्हेवाट लावून मुद्येमालाची अफरातफर केली आहे.

६) तुम्ही कसुरदार नापोशि/२३५ रवि मनोहर चव्हाण, नेमणुक पो. स्टे. उमरखेड, तुम्ही तुमच्या लोकसेवक या पदाचा दुरुपयोग करुन स्वतः करीता पैशाचे बेकायदेशिर अधिक लाभ मिळविण्याकरीता पुर्ण मुद्देमालाची पंचनामा कारवाई न करता जप्त मुद्देमाल व्यतिरीक्त काही गुटख्याचे पोते पोलीस स्टेशन अभिलेखावर रिकॉर्डवर नसलेला मुद्येमाल पोलीस स्टेशन मधील खाली बाथरुम मध्ये ठेवुन सदर मुद्देमालाची परस्पर विल्हेवाट लावली आहे. यावरुन तुम्ही गुन्हेगारी स्वरुपाच्या गैरकृत्यामध्ये लिप्त असल्याचे सबळ पुराव्यानिशी निष्पन्न होत आहे. अशाप्रकारे तुम्ही लोकसेवक या पदाला न शोभणारे बेशिस्त, बेजबाबदार, भ्रष्टाचारी आचरण, नैतिक अधःपतनाचे व पोलीस अंमलदार या पदास अशोभनीय गैरवर्तन केले असून तुमच्या या कृत्यामुळे पोलीस दलाची प्रतिमा जनमानसात मलीन होण्यास तुम्ही कारणीभूत ठरले आहात.

-: कार्यवाहीचा तपशील:-

उपरोक्त कसुरीच्या अनुषंगाने पोलीस अधीक्षक, यवतमाळ यांनी त्यांचेकडील अंतिम आदेश दि.२२/०१/२०२५ अन्वये यातील अपिलार्थी पोना/२३५ रवि चव्हाण यांना " पुढील देय वार्षिक वेतनवाढ तीन(०३) वर्ष (परिणामकारक) रोखणे " ही शिक्षा दिली आहे. सदर शिक्षेविरुध्द पोना/चव्हाण यांनी अपील अर्ज केला असता विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांनी त्यांचे अपील आदेश दि.१०/१०/२०२५ अन्वये त्यांचा अपील अर्ज "फेटाळला" आहे.

सदर शिक्षेविरुध्द पोना/चव्हाण यांनी या कार्यालयास दि.२०/१२/२०२५ अन्वये फेरतपासणी अर्ज विहीत मुदतीत सादर केला असुन, सदर फेरतपासणी अर्जात त्यांनी पुढीलप्रमाणे मुद्दे नमूद केले आहे.

-: अपिलार्थीचे विवेचन:-

मला दिलेल्या शिक्षान्वये मी खालील बाबतीमध्ये माझ्यावर झालेल्या अन्यायाच्या अनुषंगाने मी पोलीस स्टेशन उमरखेड, जि. यवतमाळ येथे नेमणुकीस असुन मी माझी ड्युटी अत्यंत सचोटीने व कायदा नियमाचे पालन करीत आहे. त्यानुसार मला माझ्या नोकरीच्या व्यतिरिक्त किरकोळ शिक्षा सुध्दा प्राप्त नाही व सदर सुडबुध्दीने व निराधार स्वरुपाचे दोषारोप पत्र माझ्यावर ठेवुन पुर्व ग्रह दुषित भावनेने कोणताही आरोप सिध्द झालेला नसतांना व तसा अहवाल प्रथम विभागीय चौकशीमध्ये सादर केला नंतर पुन्हा त्याच दोषारोपाची नियम बाह्य पध्दतीने दुस-यांदा विभागीय चौकशी करुन मला गंभीर कठोर शिक्षा देण्यात आली. सदर शिक्षेमध्ये मी अतिशय व्यतीत झाल्याने यथा योग्य न्याय करण्याच्या विनंतीसह सदर अपील अर्ज आपल्याकडे सविनय सादर आहे.

महोदय मी पोलीस स्टेशन उमरखेड येथे ड्युटीवर असतांना दि.२६/१२/२०२१ रोजी मला फोन व्दारे गोपनीय माहितीवरुन विडुळ फाटयावर एक चार चाकी वाहन अवैधरित्या सुगंधित तंबाखु गुटखा घेवुन येणार असल्याचे कळाले अशा माहितीवरुन प्रत्यक्ष घटनास्थळावर जावुन सदर संशयित वाहनाची वाट बघत

असतांना सदर वाहन समोरुन येत असतांना निदर्शनास आले. त्यानुसार सदर वाहन थांबुन वाहन चालक कडे प्राथमिक चौकशी केली व पोलीस उमरखेड येथे कर्तव्यावर असलेले पोलीस उपनिरीक्षक विनीत घाटोळ साहेबांना व पोलीस निरीक्षक माळवे साहेब यांना फोनव्दारे संपुर्ण माहिती दिली. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक विनीत घाटोळ तात्काळ घटनास्थळावर आले त्यानंतर सदर अवैध गुटखाचा पंचनामा करीत असतांना त्याच वेळी मा. उपविभागीय पोलीस अधिकारी साहेब उमरखेड येथे कर्तव्यावर असलेले पोलीस नाईक रुपेश चव्हाण व पोलीस नाईक युनुस भातनासे हे सुध्दा घटनास्थळावर आले. त्यानंतर कायदेशिर प्रक्रिया पुर्ण करुन सदर गुटख्यासह वाहन पोलीस स्टेशन उमरखेड येथे वाहन जमा केले. पोलीस उपनिरीक्षक विनीत घाटोळ यांचे मार्गदर्शनात कायदेशीर फिर्याद दिली. पोलीस स्टेशन उमरखेड अप क्र. ६८६/२०२१ कलम ३२८,३२७,३७३,१८८,३४ भा.द.वी. सहकलम ५९,२९(१), २९(२) अन्न व सुरक्षा मानवी अधिनियम २००६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. व घटनास्थळ पंचनामा नुसार अवैध्य गुटख्याचा मुद्देमाल पोलीस स्टेशन उमरखेडच्या ईमारतीच्या टेरिसवर ठेवण्यात आले.

सदर गुन्ह्याचा तपास ठाणेदार उमरखेड यांच्या आदेशावरुन सपोनि सुजाता बन्सोड यांच्याकडे देण्यात आला त्यावरुन मी त्यांना सदर गुन्ह्यातील मुद्देतील १०५ पोते गुटखा व वाहन त्यांना प्रत्यक्ष दाखवुन त्यांना सुपुर्त केले.जप्ती पंचनामा नुसार ताब्यात दिलेला मुद्देमाल दिनांक ३१/१२/२०२१ रोजी ठाणेदार उमरखेड व सपोनि सुजाता बन्सोड यांनी स्टाफसह पोलीस स्टेशनच्या टेरिसवर जावुन चेक केला तेव्हा तो पंचनाम्यानुसार तो बरोबर होता सदर बाब सपोनि सुजाता बन्सोड त्यांचे सरकारी साक्षीदार म्हणून त्यांचे उलट तपासणीच्या साक्षी मध्ये विभागीय चौकशी अधिकारी यांचे समक्ष लेखी व स्वाक्षरी सह मान्य केले आहे.

त्यानुसार आम्ही सदर गुन्ह्यातील मुद्देमालाची अफरातफर केल्या बाबतचा दोषारोप निकालच खोटा सुडबुध्दीने व कोणत्याही पुराव्या शिवाय ठेवण्यात आला असल्याची कागदोपत्री सिध्द झाले आहे.

सरकारी साक्षीदार तपासण्यात आले परंतु तपासणी दरम्यान दोषारोप पत्रातील नमुद कसुरी अहवाल व गोपनिय अहवाल व केलेल्या कसुरी बाबत कोणत्याही सरकारी साक्षीदारांचे विभागीय चौकशीला दुजोरा दिला नाही यातील साक्षीदारांना दोषारोप विषयी तीळ मात्र ही माहिती नाही अशा परिस्थितीत अपचारी यास कोणताही बचाव देण्याची आवश्यकता नव्हती करीता आपले लक्ष खालील न्याय निवाड्या कडे वेधू इच्छितो.

महोदय सदर विभागीय चौकशी मध्ये साक्षीदाराच्या उलट तपासणी मध्ये त्यांनी दोषारोप संबंधाने कोणतेही समर्थनीय दुजोरा दिला नाही. त्यामुळे दोषारोप संदिग्ध स्वरुपाचे आहे त्यानुसार महाराष्ट्र पोलीस नियमावली नियम ४४८ नुसार केवळ संशयावरुन पोलीस कर्मचा-याला दोषी ठरविता येणार नाही हे स्पष्ट निर्देश आहेत त्याचे सखोल अवलोकन होणेस विनंती आहे.

तसेच विभागीय चौकशी दरम्यान दोषारोप पुर्णत: किंवा अंशत: सिध्द झालेली नाही तरी सुध्दा कठोर शिक्षा देवून आमच्या वर अन्याय करण्यात आला आहे. माझ्याविरुध्द कोणताही पुरावा नसतांना काढलेला निष्कर्ष हे पुरावाहीन व आधारहीन आहेत. त्यामुळे सदर विभागीय चौकशीतुन मला निर्दोष घोषीत करुन माझे वरील प्रस्तावित शिक्षा मागे घ्यावीत त्यानुसार पारीत करण्यात आलेली अन्यायकारक शिक्षा रद्द करण्याबाबत ह्या अपील व्दारे विनंती आहे.

महोदय माझी पोलीस विभागात १८ वर्ष दिर्घकाळ सेवा झाली असुन मला ह्या पुर्वी उत्कृष्ट सेवालेखाच्या अनुषंगाने पोशि ते पोना एका पदावर पदोन्नती सुध्दा मिळालेली आहे व मी दोन वर्षापासुन चातारी बिट मध्ये अंमलदार म्हणून काम करत असुन बिट मध्ये ११ गावामध्ये शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित केले आहे तसेच बिट मध्ये कोणत्याही प्रकारच्या अवैध धंदा चालनार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. तसेच ११ गावातील तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष तसेच पोलीस पाटील यांचे सोबत विचार विनिमय करुन त्यांच्याशी प्रत्यक्ष संपर्क करुन गावातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने प्रतिबंधक उपाय करुन परिसरात शांतता व सुव्यवस्था राखण्यात मला परीक्षम पुर्वक काम केल्याने अनुकुल परिणाम आलेले

आहेत. व संपुर्ण बिट मध्ये सलोखाचे वातावरण निर्माण झालेला आहे. तरी सुध्दा मला विपोमनि अमरावती परिक्षेत्र यांनी मला अशी कठोर शिक्षा दिल्याने माझ्या सारख्या कर्तव्यदक्ष जबाबदारीने सर्व वरिष्ठाने दिलेल्या निर्देशाचे तंतोतंत पालन करुन कर्तव्य केले असुनही मला दिलेल्या शिक्षेने व शिक्षेच्या होणा-या परिणामाने माझे कुटुंब अध्योपणात्मकडे जावुन माझ्या कुटुंबावर व माझ्या कर्तव्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो. तरी माझ्या विनंतीचा सहानुभुतीपुर्वक विचार करुन कठोर शिक्षा खारीज करण्यास विनंती आहे.

-: निष्कर्ष:-

अपिलार्थी पोना/२३५ रवि चव्हाण यांनी या कार्यालयास केलेल्या फेरतपासणी अर्जाच्या अनुषंगाने त्यांना दि.३१/०७/२०२६ रोजी आज्ञांकीत कक्षात उपस्थित राहण्याबाबत कळविलेनुसार ते उपस्थित राहिलेले आहेत. अपिलार्थी यांनी आज्ञांकीत कक्षात त्यांना देण्यात आलेली शिक्षा ही कठोर असल्याने सदरील शिक्षा कमी करण्याबाबत विनंती केली आहे.

अपिलार्थी यांच्या फेरतपासणी अर्जातील मुद्दे, पोलीस अधीक्षक यांनी दिलेले त्यांचे अभिप्राय, विभागीय चौकशी अहवाल व त्यासोबतच्या कागदपत्रांचे अवलोकन करता अपिलार्थी यांच्याविरुध्द योग्य ती प्रक्रिया राबवून शिक्षा देण्यात आलेली आहे. त्यांच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप सिध्द होत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी फेरतपासणी अर्जात उपस्थित केलेल्या मुद्यांनुसार व आज्ञांकीत कक्षात केलेल्या कथनानुसार त्यांचा कोणताही दोष नाही असे म्हणता येणार नाही. तथापि, अपिलार्थी यांचा पुर्वसेवाभिलेख पाहता त्यांना सुधारण्याची संधी दिल्यास निश्चितच न्यायोचित होईल या निष्कर्षाप्रत मी आलो आहे. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

-: आदेश :-

मी, मधुकर पाण्डेय, अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई मला महाराष्ट्र शासन, गृह विभाग आदेश क्र.डीएलपी.०९८४/सी-३५४४-पोल-३.दि.२७/११/१९८४ अनुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन अपिलार्थी पोना/२३५ रवि चव्हाण यांना शिस्तभंगविषयक प्राधिकारी तथा पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या " पुढील देय वार्षिक वेतनवाढ तीन(०३) वर्ष (परिणामकारक) रोखणे " या शिक्षेऐवजी " पुढील देय वार्षिक वेतनवाढ दोन (०२) वर्ष (परिणामकारक) रोखणे " ही शिक्षा देण्यात येत आहे.

२. सदर शिक्षेविरुध्द शासनास अपील अनुज्ञेय नाही.

Digitally signed by
Madhukar Pandey
Date: 11-08-2026
16:52:43

( )

(मधुकर पाण्डेय)
अपर पोलीस महासंचालक (प्रशासन)
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,
पोना/२३५ रवि चव्हाण, नेमणुक- पोलीस अधीक्षक यवतमाळ
(मार्फत:- पोलीस अधीक्षक, यवतमाळ).

प्रत,
विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती
पोलीस अधीक्षक, यवतमाळ
२/- पोलीस अधीक्षक यांनी सदर आदेशाची छायांकीत प्रत पोना/चव्हाण यांना अदा करुन, सदर आदेश च्या दुय्यम प्रतीवर त्यांची दिनांकासह स्वाक्षरी घेवून, ती दिनांकीत स्वाक्षरीची दुय्यम प्रत सत्वर या कार्यालयास पाठवावी.

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक-पोअय/आस्थापना/कक्ष-९/नि.व.से.नि./ऑगष्ट- २०२६/ 8734 /२०२६ यवतमाळ, दिनांक- 27 AUG 2026

## -कार्यालयीन आदेश-

यवतमाळ जिल्हा पोलीस घटकामधील खालील नमुद पोलीस अंमलदार हे त्यांचे नावासमोर नमूद जन्म दिनांकानुसार वयाची ५८ वर्षे पुर्ण करीत आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम, 1982 मधील नियम 63 मधील तरतुद व महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शा. नि.क्र. सेनिवे/१०१९/३४/सेवा-४ दिनांक ०२ फेब्रुवारी १९९९ मधील तरतुदीनुसार दिनांक ३१/०८/२०२६ रोजी नियत वयोमनाने शासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांचे नांव दिनांक ३१/०८/२०२६ रोजी मध्यान्हानंतर पासून या आस्थापनेवरुन कमी करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदनाम | ब.नं. | पोलीस अंमलदारांचे सेवापटात नमूद संपुर्ण नांव | नेमणूक ठिकाण | जन्म दिनांक | सेवानिवृत्ती दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सपोउपनि | ४३ | रामप्रसाद रामचंद्र राठोड | पो.स्टे. दिग्रस | ०२/०८/१९६८ | ३१/०८/२०२६ |
| २ | श्रेणी-पोउपनि | ५१ | शिवाजी वसंतराव देशमुख | पो.स्टे. खंडाळा | १५/०८/१९६८ | ३१/०८/२०२६ |
| ३ | सपोउपनि | ९७ | रोहीदास झामा चव्हाण | पो.स्टे.पुसद शहर | ०२/०८/१९६८ | ३१/०८/२०२६ |
| ४ | चाश्रेणी-पोउपनि | २६० | विलास कान्हुजी बहादुरे | पो.स्टे. पुसद ग्रा. | ०९/०८/१९६८ | ३१/०८/२०२६ |
| ५ | सपोउपनि | २८३ | घनश्याम हरलाल राठोड | पो.स्टे.नेर | २०/०८/१९६८ | ३१/०८/२०२६ |
| ६ | श्रेणी-पोउपनि | १९०८ | शमशोद्दिन निजामोद्दिन मलनस | पो.स्टे.यवतमाळ शहर | २७/०८/१९६८ | ३१/०८/२०२६ |

(कुमार चिंता) भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,
वरील सर्व संबंधित पोलीस अंमलदार
**मार्फत :- ठाणेदार, पो.स्टे. दिग्रस/खंडाळा/पुसद शहर/पुसद ग्रा./ नेर/यवतमाळ शहर**
2/- यांनी वर नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ३१/०८/२०२६ रोजी मध्यान्हानंतर पासून नियम वयोमानानुसार सेवानिवृत्तीवर सोडावे व तसा अनुपालन अहवाल न चुकता या कार्यालयास (आस्थापना शाखेस) सादर करावा. तसेच सदर पोलीस अंमलदार यांचा सिक/गैरहजर कालावधीचा अहवाल व ईतर अहवाल प्रलंबित असल्यास तात्काळ विनाविलंब या कार्यालयास पुढील कार्यवाहीकरीता पाठविण्यात यावा. तसेच सदर वरील सेवानिवृत्त पोलीस अंमलदार यांना किट पेटी, सरंजाम साहित्य पोलीस मुख्यालय, यवतमाळ येथे जमा करण्याबाबत सुचना दयावी.

प्रतिलीपी :- कार्यालय अधीक्षक/प्रमुख लिपीक-आस्थापना शाखा/लेखा शाखा/पत्रव्यवहार शाखा/विभागीय चौकशी शाखा/वेतन लिपीक (कक्ष-१८)/पेन्शन लिपीक (कक्ष-१६)/भविष्य निर्वाह निधी लिपीक/विभागीय चौकशी लिपीक/पोलीस कल्याण निधी लिपीक/सहा. आस्थापना लिपीक (कक्ष-९, (१)(४))/प्रवास भत्ता लिपीक/वस्त्रागार पो.मु. यवतमाळ/वैद्यकीय देयक लिपीक/ईमारत लिपीक/पोलीस राजपत्र लिपीक(कक्ष-१४) यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरीता.

प्रत :- पोलीस उप अधीक्षक(मुख्यालय) यवतमाळ/पोलीस नियंत्रण कक्ष/प्र.अधिकारी कल्याण शाखा, यवतमाळ.
राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, यवतमाळ.

## भाग - ०६

# प्रशिक्षण व इतर

क्रमांक:पोअय/कक्ष-९(२)/परिक्षा परवाणगी/ 8627 /२०२६
कार्यालय पोलीस अधिक्षक, यवतमाळ
एल.आ.सी.चौक ता. व जि.यवतमाळ.
पिन कोड : ४४५००१
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक : 24 AUG 2026

# आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार पोलीस नियमावली भाग (१) मधील नियम ४२८ (१) प्रमाणे सदर परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येत आहे. त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या रजेची हमी देता येणार नाही. तसेच शासकिय कामकाजात अडथळा येणार नाही, या अटीचे अधीन राहुन परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अमंलदार नाव पद व ब.नं. | नेमणुक | परिक्षा विवरण |
|---|---|---|---|
| १ | नवप्रमपोशि/६३०रामा मंजंग पांडागळे | पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभुळगाव, लातुर | महाराष्ट्र लोकसेवा अयोग मार्फत महाराष्ट्र गट- क (अराजपत्री)सेवा संयुक्त पुर्व परीक्षा-२०२६(MPSC) |
| २ | नवप्रमपोशि/८५७ बळीराम बालासाहेब मुळे | | |
| ३ | नवप्रमपोशि/८९४ धिरज राजेंद्र ठोसरे | | |

उपरोक्त पोलीस अमंलदार यांना पोलीस नियमावली भाग (१) मधील नियम ४२८ (१) प्रमाणे सदर परिक्षेला बसण्याची परवानगी देण्यात येत आहे.

(अशोक थोरात)
प्र.पोलीस अधिक्षक, यवतमाळ

प्रति,
प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र बाभुळगाव, लातुर
२/. वरील नमुद पोलीस कर्मचारी यांना परिक्षा परवानगी बाबत समज दयावी.

प्रत माहितीस व कार्यवाहीस,
डिपीजी लिपीक (कक्ष-१४) पो.अ. कार्या यवतमाळ.

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्र.(07232) 256700 फॅक्स क्र. (07232) 256710
समाधान क्रमांक.940863282

क्रमांक:पोअय/कक्ष-९(३)/परीक्षा परवानगी /8548 /२०२६ यवतमाळ दिनांक 2 4 AUG 2026

## कार्यालयीन आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांनी केलेल्या विनंती अर्जानुसार पोलीस नियमावली भाग (१) मधील नियम ४२८ (१) प्रमाणे **सन २०२६** मध्ये घेण्यात येणाऱ्या स्पर्धा परीक्षेस बसण्याकरीता नमुद अटीचे अधीन राहुन परिक्षेला अर्ज करण्याची परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अमंलदार नाव पद व ब.नं. | परिक्षा विवरण |
|---|---|---|
| १ | चामपोशि/१०७४ दिक्षा नामदेव पांढव,नेम-मोटर परीवहन विभाग,यवतमाळ | महाराष्ट्र लोकासेवा आयोगा मार्फत घेण्यात येणाऱ्या गट "क" सयुक्त पुर्व परीक्षा सन-२०२६ ( जाहीरात क्र.०१७/२०२६ दि.१५/०६/२०२६) |

**अटी व शर्ती :-**

१) परीक्षेकरीता कोणतेही विशेष सवलत देय नाही.
२) सदर परवानगीमुळे त्यांचे दैनंदिन कामकाजावर विपरीत परीणाम होणार नाही.
३) परीक्षेस बसणे शक्य व्हावे म्हणुन रजा आगावु मंजुर करुन घेणे आवश्यक आहे.
४) परीक्षेच्या तयारीसाठी रजा हक्क म्हणुन मागता येत नसल्याने आपात्कालीन परीस्थितीत किंवा प्रशासकिय कारणास्तव सदर रजा नाकारली जावु शकते.
५) कर्तव्य बजावत असतांना अध्ययन करीत असल्याचे आढळल्यास व कर्तव्यात बेपर्वाई निदर्शनास आल्यास शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.
६) सदर परीक्षा कार्यालयीन कामाकाजाच्या दिवशी असल्यास त्यांना त्यांचे रजा खाती देय असलेली रजा घ्यावी लागेल परंतु विशेष बंदोबंस्त तसेच शासकिय कामकाजा करीता रजा देणे शक्य नसेल तर त्या दिवसाची रजा नाकारण्याची अधिकार प्रभारी अधिकारी यांना राहील.
७) सदर परीक्षेअंतर्गत नमुद कोणत्याही पदासाठी निवळ झाल्यास त्यावेळी अस्तित्वात असलेल्या नियमाप्रमाणे पुढील कार्यवाही करण्यात येईल.

**( मा.पो.अ यांचे मान्यतेने...)**

21/8

**( राजेशकुमार गाठे )**
**पोलीस उप अधीक्षक (मुख्या)**
**पोलीस अधीक्षक कार्यालय यवतमाळ**

**प्रति,**

चामपोशि/१०७४ दिक्षा नामदेव पांढव,नेम-मोटर परीवहन विभाग,यवतमाळ
मार्फत :- पोलीस निरीक्षक,मोटर परीवहन विभाग,यवतमाळ.
२/. वरील नमुद पोलीस कर्मचारी यांना परिक्षा परवानगी बाबत समज दयावी.
प्रत :- डिपीजी लिपीक (कक्ष-१४)/नोंदणी लिपिक पो.अ. कार्या यवतमाळ यांना माहीती व कार्यवाहीस्तव.

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in
दुरध्वनी क्र.(०७२३२) २५६७०० फॅक्स क्र. (०७२३२) २५६७१० समाधान क्रमांक.९४०८६३२८२

क्रमांक:पोअय/कक्ष-९(३)/सिक कालावधी /8546/२०२६ यवतमाळ दिनांक. 24 AUG 2026

# कार्यालयीन आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांनी रुग्ननिवदेन करुन सिक मेमोवर रवाना झाले होते. कर्तव्यावर हजर होतांना त्यांनी डॉ.यांचे फिट फॉर प्रमाणपत्र कागदपत्रासोबत जोडले आहे.त्यांचे वैद्यकिय कागदपत्रे व त्यांचे प्रभारी अधिकारी यांचे शिफारशी नुसार त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कालावधी (म.ना.से) रजा नियम १९८१ मधील नियम नियम (६१) नुसार परावर्तीत रजा रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस अंमलदार यांचे नाव व पद ब.न.नेमणुक | रुग्ण निवेदन कालावधी |
|---|---|---|
| १ | मसफौ/1100 आलोचना धन्यकुमार येरमल,नेम-वा.उपशाखा पुसद | दि.13/07/2026 ते 28/07/2026=15 दिवस म.ना.से रजा नियम 61 नुसार "परावर्तीत रजा" मंजुर करण्यात येत आहे. |
| २ | पोहवा/1499 राजेंद्र जानराव तुरारे,नेम-जि.वा.नि शाखा यवतमाळ | दि.28/05/2026 ते 25/06/2026=28 दिवस म.ना.से रजा नियम 61 नुसार "परावर्तीत रजा" मंजुर करण्यात येत आहे. |

21/8

( राजेशकुमार गाठे )
पोलीस उपअधीक्षक (मुख्या)
पोलीस अधीक्षक,कार्यालय यवतमाळ

प्रति,

वरील नमुद पोलीस अंमलदार

मार्फत :- पोलीस निरीक्षक,पो.स्टे.जि.वा.नि शाखा यवतमाळ/वा.उपशाखा पुसद

२/-वर नमूद पोलीस अंमलदार यांना त्यांचे मंजुर रजेची माहीती देवुन आपल्या येथील सिक रजिस्टर मध्ये तशी नोंद करण्यात यावी.

प्रत:- कक्ष-१८ वेतन लिपिक/ कक्ष-१४ राजपत्र लिपिक/नोंदणी लिपिक यांना योग्य त्या कार्यवाहीस्तव.

प्रत कार्यवाहीस :- प्रभारी अधिकारी,पो.स्टे.सायवर (E- HRMS),यवतमाळ योग्य कार्यवाहीस.

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोडः ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्र:पोअय/कक्ष-१०/प्रशिक्षण/ वुमेन सेफ्टी/पुणे / ८६८२/२०२६, दिनांक 25 AUG 2026

आदेश

संदर्भ:- अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. अपोमसं/प्रशि-२/आर्थिक गुन्हयाचा तपास/६५/२०२६/१५०२, दि.२०.०८.२०२६

विषय :- "वुमेन सेफ्टी ( women safety)" या विषयाचे प्रशिक्षणाकरिता पोलीस संशोधन केंद्र, पुणे येथे हजर राहणेबाबत.

****

उपरोक्त विषय व संदर्भान्वये, पोलीस संशोधन केंद्र, पुणे आणी बीपीआरडी(BPR&D), नवी दिल्ली यांचे संयुक्त विद्यमानाने पोलीस संशोधन केंद्र, पुणे येथे "वुमेन सेफ्टी ( women safety)" या विषयाबाबतचे प्रशिक्षण आयोजित करण्यात आलेले आहे. सदर प्रशिक्षणाकरिता यवतमाळ जिल्हा येथील खालील ०१ पोलीस अधिकारी (रकाना क्र.४ मध्ये नमूद) यांची निवड करण्यात आलेली आहे.

| अ.क्र. | प्रशिक्षणाचा विषय | प्रशिक्षण कालावधी | प्रशिक्षणाकरिता निवड केलेले अधिकारी यांचे नांव |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | "वुमेन सेफ्टी women safety" | दि. ३१/०८/२०२६ ते ०४/०९/२०२६ | सपोनि/प्रसेनजित चंद्रकांत जाधव, नेमणुक पोस्टे. महागाव |

तरी सपोनि/प्रसेनजित चंद्रकांत जाधव, नेमणुक पोस्टे. महागाव यांनी दि.३०/०८/२०२६ रोजी २१.०० वाजेपावेतो पोलीस संशोधन केंद्र, पुणे येथे प्रशिक्षणाकरिता न चूकता हजर राहावे. सदरचे प्रशिक्षण हे साध्या कपडयात (Plain Clothes) राहील. परंतु प्रशिक्षण काळात जीन्स/टि-शर्ट परिधान करु नये.

(कुमार चिंता)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

प्रति,
सपोनि/प्रसेनजित चंद्रकांत जाधव, नेमणुक पोस्टे. महागाव

प्रत :- माहितीकरिता सविनय सादर,
मा.अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य मुंबई
मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती.

प्रत :-पोलीस अधीक्षक, पोलीस संशोधन केंद्र, पुणे यांना माहितीकरिता सस्नेह अग्रेषित.

प्रत-:पोलीस उप अधीक्षक, मुख्यालय/उपविपोअ-उमरखेड /ठाणेदार, पोस्टे. महागाव/पोलीस नियंत्रण कक्ष/ राजपत्र लिपिक, पो.अ.कार्यालय, यवतमाळ यांना आवश्यक कार्यवाहीकरिता.

क्र.पोअय/कक्ष-13/प्रशि./8689/2026
कार्यालय पोलीस अधिक्षक , यवतमाळ
एल.आय.सी.चौक, ता. व जि.यवतमाळ
पिन कोड 445 001.
Email: sp.yavatmal@mahapolice.gov.in
दिनांक :- 27 AUG 2026

कार्यालयीन आदेश -

विषय :- WATCHERS DUTY COURSE NO. 08 प्रशिक्षण बाबत.

संदर्भ:- मा. संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र इंटेलिजन्स अकॅडमी, पुणे यांचेकडील OW/NO.MIA/TRG/AUG & SRPT/MIA PUNE COURSE DEATILS/ 2026/ 2689 DATE- 26/07/2026

---------oooo----------

महाराष्ट्र इंटेलिजन्स अकॅडमी, पुणे येथे दि. ०२/०९/२०२६ ते दि. ०४/०९/२०२६ या कालावधीत आयोजीत WATCHERS DUTY COURSE NO. 08 प्रशिक्षणासाठी खालील नमुद पोलीस अंमलदार यांची निवड करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस अंमलदार यांची नावे | नेमणुक |
|---|---|---|
| ०१ | पोशि/२६८७, ब्रम्हदेव रामराव टाले | पोस्टे. आर्णी |

ठाणेदार, पोस्टे. आर्णी यांनी निवड झालेले वरिल पोलीस अंमलदार हे दि. ०१/०९/२०२६ रोजी २०.०० वाजता पर्यंत प्रशिक्षण ठिकाणी पोहचतील या बेताने त्यांना मोकळीक करावे. सदर प्रशिक्षणासाठी जाणा-या पोलीस अंमलदार यांनी प्रशिक्षण ठिकाणी जाताना सोबत आय कार्ड, स्पोर्ट ड्रेस व मोकळीक मेमो घेण्याबाबत तसेच प्रशिक्षण वर्गाच्या दरम्यान प्रशिक्षणार्थी पोलीस अंमलदार यांना जिन्स, टी-शर्ट वगळुन इतर साधे पोषाख परिधान करण्यास मुभा असल्याबाबत संबंधित प्रभारी अधिकारी यांनी सुचना द्याव्यात.

सदर प्रशिक्षणाचा प्रशिक्षण शुल्क रु. ३,००० /- खर्च २०५५ पोलीस १०९ (००) (०१) जिल्हा पोलीस दल - 2055A195 – 50 या उद्धीष्ठाखाली सन २०२६ - २०२७ या वित्तीय वर्षाच्या मंजुर अनुदानातुन भागविण्यात यावा.

( कुमार चिंता )
पोलीस अधिक्षक,यवतमाळ

प्रती - ठाणेदार पोस्टे. आर्णी.

२/- सदर आदेशाची दुय्यम प्रत निवड करण्यात आलेल्या पोलीस अंमलदार यांना अदा करावी. निवड झालेले पोलीस अंमलदार यांना संयुक्तिक कारणास्तव प्रशिक्षणाकरीता पाठविणे शक्य नसल्यास पोस्टे. मधील पर्यायी पोलीस अंमलदारास सदर प्रशिक्षणाकरीता पाठवुन तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

प्रत - डीपीजी लिपीक यांना प्रसिदधीस.

प्रत सादर -

मा. संचालक, महाराष्ट्र इंटेलिजन्स ॲकेडमी,एस आर पी एफ ग्रुप ०१ रामटेकडी, हडपसर पुणे

कार्यालय पोलीस अधीक्षक, यवतमाळ.
एल. आय. सी. चौक, ता. व जि. यवतमाळ.
पिन कोड: ४४५ ००१.
Email- sp.yavatmal@mahapolice.gov.in

क्रमांक:पोअय/आस्थापना/कक्ष-९/श्रेणी पोउपनि-संबोधन/ 875 /२०२६ यवतमाळ, दिनांक- 27 AUG 2026

कार्यालयीन आदेश

संदर्भ :- 1) महाराष्ट्र शासन गृह विभाग, शा.नि. क्र.पीएमएन-0821/प्र.क्र.533/पोल-5 ब, दि.25/02/2022
2) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/6/पदो/ग्रेड-पीएसआय/34/2022 दिनांक 28/03/2022.
3) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य , मुंबई यांचे पत्र क्र. पोमसं/6/पदो/ग्रेड-पीएसआय/34/2022 दिनांक 07/04/2022.

विषय :- सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) संबोधण्याबाबत.

*******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक पीएमएन-0821/प्र.क्र.533/पोल-5 ब, दि.25/02/2022 च्या शासन निर्णयान्वये पोलीस नाईक हा संवर्ग रद्द करुन या संवर्गातील पदे पोलीस शिपाई, पोलीस हवालदार, व सहायक पोलीस उपनिरीक्षक या संवर्गामध्ये वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच शासन निर्णया मधिल सुचना आदेशाची अंमलबजावनी करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचे स्तरावर सुकाणू समीती गठीत करण्याबाबत सुचना दिलेल्या आहेत.

संदर्भ क्र. 1 मधिल शासन निर्णयातील सुचनांची अंमलबजावनी करण्यासाठी अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुबई यांचे अध्यक्षतेखाली शासन निर्णयातील तरतुदीनूसार पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक 08/03/2022 अन्वये सुकाणू समीती स्थापन केली. सदर समीतीच्या दि. 05/03/2022 व दि.14/03/2022 व व्हिडीओ कॉन्फरंन्सद्वारे दि. 11/04/2022 रोजी राज्यातील घटक प्रमुख यांचे बरोबर बैठक आयोजीत करण्यात आली होती. त्यानुसार तसेच संदर्भिय शासन निर्णयानुसार सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधन करण्याकरीता अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्यवाही करणे बाबत खालील प्रमाणे सुचना देण्यात आल्या आहेत.

**1) पोलीस दलामध्ये एकुण 30 वर्षे सेवा पुर्ण**
**2) सहायक पोलीस उपनिरीक्षक पदावर किमाण 03 वर्षे सेवा पुर्ण**
**3) आश्वासीत प्रगती योजनेनुसार पोलीस उपनिरीक्षक संवर्ग पदाची वेतनश्रेणी घेत असलेले.**
**4) पोलीस उपनिरीक्षक संवर्ग पदाची वेतनश्रेणी घेत असलेले ( म्हणजेच सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे मुळ वेतन पोलीस उपनिरीक्षक वेतन आयोगातील LEVEL S-14-38600/- पेक्षा जास्त)**

उपरोक्त प्रमाणे महाराष्ट्र शासन, गृह विभाग शासन निर्णय क्र.पीएमएन-0821/प्र.क्र.533/पोल-5 ब, दि.25/02/2022 मधिल निर्देशानुसार व अपर पोलीस महासंचालक (आस्थापना) यांचे कडील पत्र क्र. पोमसं/6/पदो/ग्रेड-पीएसआय/34/2022 दि.28/03/2022. व अध्यक्ष सुकाणू समीती तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशिक्षण व खास पथके) महाराष्ट्र राज्य, मुबई यांचे कडील पत्र क्र. पोमसं/6/पदोन्नती ग्रेड-पीएसआय/34/2022 दिनांक 22/04/2022. मधिल विहीत अटींच्या अधिन राहुन या आस्थापनेवरील जे सहायक पोलीस उपनिरीक्षक उपरोक्त नमुद निकष पुर्ण करीत आहेत, त्यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) संबोधण्याकरीता आस्थापना मंडळाची बैठक दि. 24/08/2026 रोजी आयोजित करण्यात आली होती.आस्थापना मंडळाच्या शिफारसीनुसार खालील नमुद सहायक पोलीस उपनिरीक्षक यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्याबाबत मान्यता देण्यात येत असून **खालील नमुद श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) यांना नियमीत पोलीस उपनिरीक्षकांची पदोन्नती मिळेपर्यंत ते सहायक पोलीस उपनिरीक्षकाची कर्तव्ये व जबावदाऱ्या पार पाडतील.**

| अ. क्र. | पद नाम | ब.नं. | सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे संपुर्ण नाव | नेमणुक | पोलीस शिपाई भरती दिनांक | सपोउपनि पदोन्नती दिनांक | एकुण सेवा कालावधि (वर्ष) | सपोउपनि पदावर एकुण सेवा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ASI | 1501 | संजिव पांडुरंग रामटेके | पोलीस मुख्यालय | 01/08/1989 | 07/03/2023 | 37 वर्षे | 3 वर्षे |
| 2 | ASI | 585 | सुरेश माहादेव डाखोरे | पो.स्टे.बाभुळगाव | 26/04/1990 | 26/05/2023 | 36 वर्षे | 3 वर्षे |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | ASI | 863 | नरेंद्र पंजाबराव लावरे | पो.स्टे.दारव्हा | 01/09/1990 | 26/05/2023 | 35 वर्षे | 3 वर्षे |
| 4 | ASI | 1621 | संजय रामचंद्र बोराडे | पोलीस मुख्यालय | 21/12/1991 | 26/05/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 5 | ASI | 1617 | बजरंग भऊराव राजगडकर | ना.ह.स.पथक | 21/12/1991 | 08/04/2022 | 34 वर्षे | 4 वर्षे |
| 6 | ASI | 1574 | संगिता विश्वनाथ भगत | पोलीस मुख्यालय | 21/12/1991 | 26/05/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 7 | ASI | 708 | महादेव मुकूंद गायकवाड | पो.नि. कक्ष | 21/12/1991 | 26/05/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 8 | ASI | 1615 | मनोज यशवंत अभ्यंकर | पो.स्टे.अवधुतवाडी | 21/12/1991 | 07/03/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 9 | ASI | 399 | गजानन रामलु अडप्पावार | पो.स्टे.पांढरकवडा | 27/12/1991 | 26/05/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 10 | ASI | 764 | राजु चंपतराव रोकडे | पोलीस मुख्यालय | 04/01/1992 | 26/05/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 11 | ASI | 833 | शेखर बंसिलाल राठोड | पो.स्टे. नेर | 23/06/1992 | 26/05/2023 | 34 वर्षे | 3 वर्षे |
| 12 | ASI | 233 | गणेश गंगाधर आगे | पो.स्टे.वडगाव जं. | 15/11/1992 | 26/05/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 13 | ASI | 832 | जगदिश किसनराव भगत | पो.स्टे. लोहारा | 14/01/1993 | 14/08/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 14 | ASI | 544 | गणेश फकीराजी बुरेवार | पो.स्टे.यवतमाळ ग्रा. | 14/01/1993 | 26/05/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 15 | ASI | 271 | सुनिल नामदेवराव इंगोले | वा.शा.यवतमाळ | 14/01/1993 | 13/06/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 16 | ASI | 581 | दिलीप सिधु सावळे | पो.स्टे.लोहारा | 14/01/1993 | 26/05/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 17 | ASI | 494 | राजेश पुडलीकराव चौधरी | पो.स्टे.कळंब | 14/01/1993 | 07/03/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 18 | ASI | 495 | संतोष पुरूषोत्तम ढाकरगे | पो.स्टे.कळंब | 14/01/1993 | 26/05/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 19 | ASI | 1878 | संजय रामचंद्र गायकवाड | पोलीस मुख्यालय | 14/01/1993 | 07/03/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 20 | ASI | 1664 | शेख मसुद शेख मुनाफ | पो.स्टे.पुसद ग्रा. | 14/01/1993 | 26/05/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |
| 21 | ASI | 101 | गणेश दामोधर डोंगरे | पोलीस मुख्यालय | 14/01/1993 | 26/05/2023 | 33 वर्षे | 3 वर्षे |

उपरोक्त नमुद करण्यात आलेल्या श्रेणी पोलीस उपनिरीक्षकापैकी एखाद्या विरुध्द आता गुन्हा दाखल झालेला असेल/ निलंबनाची कार्यवाही/न्यायालयीन प्रकरण/विभागीय चौकशी अगर शिस्तभंगविषयक कार्यवाही चालु असेल अथवा एखादी शिक्षा भोगत असेल तर अशा श्रेणी पोलीस उपनिरीक्षक यांना आदेशाची प्रत अदा न करता प्रभारी अधिकारी यांनी त्याबाबतची सविस्तर माहीती या कार्यालयास सादर करावी.

महाराष्ट्र शासन गृह विभाग, शा.नि. क्र.पीएमएन-0821/प्र.क्र.533/पोल-5 ब, दि.25/02/2022 मधिल मुद्दा क्रमांक 10 मध्ये नमुद करण्यात आल्याप्रमाणे सेवा जेष्ठतेनुसार पदोन्नतीने नियुक्त होणाऱ्या पोलीस उपनिरीक्षक यांना महाराष्ट्र पोलीस अकादमी येथे तिन महीन्याचे प्रशिक्षण देण्यात येते. त्याच धर्तिवर श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) म्हणुन संबोधल्या जाणाऱ्या सहायक पोलीस उपनिरीक्षकास महाराष्ट्र पोलीस अकादमी नाशिक येथे 12 आठवडयाचे प्रशिक्षण अनिवार्य असेल.

**महाराष्ट्र शासन गृह विभाग, शा.नि. क्र.पीएमएन-0821/प्र.क्र.533/पोल-5 ब, दि.25/02/2022 मधिल मुद्दा क्रमांक 12 मध्ये नमुद करण्यात आल्याप्रमाणे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) म्हणुन संबोधन केवळ वैयक्तीकरीत्या राहील व सबंधित सहायक पोलीस उपनिरीक्षक यांचे सेवानिवृती पर्यत किंवा ते पोलीस उपनिरीक्षक पदावर नियमीत पदोन्नती होईपर्यत लागु राहील.**

महाराष्ट्र शासन गृह विभाग, शा.नि. क्र.पीएमएन-0821/प्र.क्र.533/पोल-5 ब, दि.25/02/2022 मधिल मुद्दा क्रमांक 13 मध्ये नमुद करण्यात आल्याप्रमाणे श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) म्हणुन संबोधित करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याच्या गणवेशात अतिरीक्त एक स्टार समाविष्ट करण्यात यावा. त्यानुसार गणवेशातील अनुशंगीक बदलाच्या दृष्टीकोनातुन मुंबई पोलीस मान्युअल 1959 , खंड 1 प्रकरण 7 अंतर्गत आवश्यक ते बदल करण्यात यावे असे नमुद आहे.

संबंधित प्रभारी अधिकारी यांनी नमुद सहायक पोलीस उपनिरीक्षका यांना श्रेणी पोलीस उपनिरीक्षक संबोधण्याच्या आदेशाच्या प्रती संबंधितास अदा करुन दुय्यम प्रतिवर संबंधितांची दिनांकीत स्वाक्षरी घेवून स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

( कुमार चिंता )भा.पो.से.
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

**प्रति.**

सर्व सर्बधित पोलीस अंमलदार.

मार्फत:- संबंधित ठाणेदार/ शाखा प्रमुख यांनी सदर श्रेणी पोलीस उपनिरीक्षक (Grade-PSI) संबोधण्याचे आदेश सर्व पोलीस अंमलदार यांना गणनेत वाचुन दाखवावेत व त्याबाबतची नोंद तैनाती नोंदवहीत घेवुन त्या बाबतचा सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत-** अपर पोलीस अधिक्षक, यवतमाळ /पोलीस उपअधिक्षक (मुख्या) यवतमाळ/ सर्व उपविपोअ/ पोलीस नियंत्रण कक्ष/प्र.ली.लेखा शाखा/पत्रव्यवहार शाखा/वि.चौ. शाखा/ पेंशन लिपीक/आस्थापना शाखा-09 (1) ते (6)/वेतन लिपीक (कक्ष- 18)/डिजीपी लिपीक